मालकांनी माझ्या वडिलांनाच मुद्दाम कंपनीच्या बिऱ्हाडी नेले व त्यांना शांतपणे सारे समजुतीने सांगितले. तसेच मालकांनी लोकमान्यांनाही हा सारा प्रसंग सांगून कंपनीच्या बिऱ्हाडी येण्यासाठी आग्रहाने निरोप पाठवला व वडिल आल्यावेळीच स्वत: लोकमान्य टिळकही तिथे हजर झाले. माझ्या वडिलांना लोकमान्यांनी इतकेच सांगितले की, "ही माझी कंपनी आहे ! तुम्ही नारायणाबद्दल कसलीच काळजी करू नका. तुमच्या मुलाचे अकल्याण मी कधीच होऊ देणार नाही हे नक्की लक्षात ठेवा !"

— गंधर्व आत्मचरित्रातील एक पान.


# माणूस

शनिवार
२ ऑक्टोबर
१९७१
पन्नास पैसे


सतत पन्नास वर्ष
रंगभूमीचे सम्राटपद उपभोगणाऱ्या बालगंधर्वांनी
गोहरबाईच्या आग्रहाने लिहिलेले
प्रथमच उजेडात येत असलेले आत्मचरित्र

# चंद्रोदय

आणि १९५५ नंतर
सर्वस्व गमावलेल्या
विकलांग झालेल्या
गंधर्वांची झालेली उदास अखेर

# चंद्रास्त

अनेकांच्या मुलाखतीवर आधारीत एक स्वतंत्र लेख
सादरकर्ते
रवींद्र पिंगे

माणूस दिवाळी अंक; एक प्रमुख आकर्षण.

शिवाय...

...शिवाय

दुसरी एक मनमोकळी आत्मकथा
मनाला चटका लावून जाणारी
– एका कॉम्रेडची

## : कधी आणि कोठे तरी

---

एक परिसंवाद

## : भारताला सिझोफ्रेनिया झाला आहे काय ?

काही विचारवंत

---

'माणूस 'वर नाराज असलेल्या क्रिकेटप्रेमिकांसाठी

- इंग्लंड दौऱ्याचा संपूर्ण आढावा घेणारा
- अजित वाडेकर, सुनिल गावस्कर, एकनाथ सोलकर यांच्या मुलाखतींवर आधारित एक खास लेख

---

- ब. मो. पुरंदरे, दि. बा. मोकाशी, सौ. कविता नरवणे, द. पां. खांबेटे,
- व. कृ. जोशी आणि ग्यानबा यांचे निवडक साहित्य

---

## : माणूस दिवाळी अंक

पृष्ठ संख्या : सुमारे पावणेदोनशे

किंमत : चार रुपये

प्रसिद्धी : १० ऑक्टोबर १९७१

---

यापुढे निघणारा ९ ऑक्टोबरचा अंक दिवाळी अंक म्हणून प्रसिद्ध होईल. त्यानंतर एक महिना अंक प्रकाशित होणार नाही. १३ नोव्हेंबर पासून अंक प्रकाशन पुन्हा सुरू होईल. वाचक–वर्गणीदार–विक्रेते यांनी कृपया नोंद घ्यावी.

| माणूस | शनिवार | २ ऑक्टोबर १९७१ | पन्नास पैसे |
| --- | --- | --- | --- |
| वर्ष | अंक | वार्षिक वर्गणी | परदेशची वर्गणी |
| अकरा | अठरा | पंचवीस रुपये | पंचेचाळीस रुपये |

# माणूस

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

**सप्रेम नमस्कार...**

▫ आपला माणूस मी आवडीने वाचते. त्यातले बांगला देशावरचे लिखाण उद्बोधक असते. रवींद्र पिंगे यांचे लिखाणही अनेकदा मन वेधून घेते. पण हल्ली देवीदास बागुल यांची 'आस्तिक-नास्तिक' ही लेखमाला मूळचे संतवाङ्मय, संतजीवन व संतांचे आधुनिक पुरस्कर्ते यांचा जो अर्थ लावीत आहे, त्यातली विसंगती प्रगट करते आहे. हे लेख वाचून फार आनंद झाला. मतांचा आग्रह न ठेवता, या विशालहृदयी वाङ्मयाचे चिंतन मन मोकळे ठेवून होणे अत्यावश्यक आहे. सोवळेपणाच्या भिंती व संकुचित वृत्ती सोडून या वाङ्मयाचे विवेचन व रसग्रहण नव्या अनुभूतीने करणे जरूर होते. बागुल यांना संतवाङ्मयात प्रथमपासून रस होता. आपण त्यांच्या या सहजप्रवृत्त आवडीला प्रोत्साहन दिलेत हे पाहून फार बरे वाटते.

**२१ सप्टेंबर १९७१** **दुर्गा भागवत, मुंबई**

## खोपडीऐवजी अंगुरासव

▫ खालापूर तालुक्यातील खोपोली येथे जी दुर्घटना घडली त्यामुळे सर्व मंडळींनाच मोठा धक्का बसला. झाली ही गोष्ट वाईट झाली हे सर्वच कबूल करतात. सध्या एकमेकांवर दोषारोप करण्याची जणू काही चढाओढच लागलेली दिसते.

साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

गेल्या २०–२२ वर्षांच्या राज्यकर्त्यांच्या कारभाराच्या नाकर्तेपणाचा हा पुरावा आहे.

सोयीनुसार म. गांधींच्या नावाची जपमाळ ओढत त्यांच्या कार्याला हरताळ फासण्याचे कार्य सगळीकडे चालू आहे. खाटळभर कायदे करावयाचे जणू यांना व्यसनच जडले आहे; त्याची अंमलबजावणी कशी होते आहे ते पाहायचे नाही, किंबहुना कोणी तक्रार केल्यास 'भीक नको पण कुत्रा आवर' अशी तक्रार करणाऱ्यावरच पाळी येते. त्या दिवशी एकादशी असल्यामुळे सुदैवाने खालापूरला खोपडी-एजंटचा पहिला माल शिल्लक होता म्हणून खोपोलीहून आणला गेलेला ताजा माल विक्रीस काढला गेला नव्हता. जर का ताज्या मालाची विक्री होती तर कमीत कमी ५०–६० माणसे दगावली असती व त्यात किमान ४–५ तरी पोलीस कामास आले असते.

खालापूर गावात मराठी शाळेसमोर राजरोस या मालाची विक्री होत असे. त्या विक्रेत्यास विचारले तर तो चक्क सांगे की, मी दरमहा २००।– रु. हप्ता देतो. ते कमी पडले की त्याला कधीमधी पोलीस-स्टेशनला बोलावून हप्ता वसूल करून सोडून दिले जाई.

दिवसा ढवळ्या तालुक्याचे ठिकाणी मुलाबाळांसामोर भर बाजारात कातकरी मातकरी बाया माणसेसुद्धा चाळे करीत. त्यामुळे शरमेने मान खाली घालण्याचा प्रसंग येई.

दारू व जुगार यांनासुद्धा ऊत आला आहे. पुरुषार्थ करण्याच्या फक्त दोनच गोष्टी जणू आज शिल्लक आहेत. चांगली चांगली म्हणविणारी माणसे 'रमी' या सोज्वळ नावाखाली राजरोस जुगार खेळताना दिसतात. तो खळ मध्यंतरी सार्वजनिक ठिकाणी खेळला जात असे. काहींनी तक्रार केल्यामुळे तो आता खाजगी जागेत सुरू आहे. त्याकरिता बाहेरगावाहून काही माणसे हा खेळ खेळणेस येत असतात. खाजगी जागेत हे खेळ खेळण्यास बंदी नसल्याचे समजते. आणि 'कुंपणच शेत खात असलेमुळे' त्याचाही काही उपयोग नाही. त्यांचे घरातील माणसांचा कानोसा घेतला म्हणजे याचा प्रत्यय येतो. असो.

या सर्व खोपडी प्रकरणात 'वैभव'च्या मधुशेटचे नाव सर्वमुखी झाले आहे पण या 'पोक्या मधु'ला 'मधूशेट' कोणी बनविले? पंधरा वर्षांपूर्वी या मधूचा उपयोग मोटारवाल्यांकडून चवली-पावली वसूल करणेसाठी पोलीसखाते करून घेत असे. त्यातच सर्वांची भागी असे. पुढे हा मधू मोठा झाला. त्याला त्या खात्यातील काही मार्गदर्शक भेटले व त्यांनीच मधूला 'मधूशेट' बनविले. बिचारा अशिक्षीत मधू यांचे मार्गदर्शनाने 'शेट' बनला. पैशाचा लोभ कोणाला होत नाही.

गेल्या १५–२० वर्षात असे कितीतरी मधुशेट गावोगावी निर्माण झाले आहेत. त्यांना पाठीशी घालणेचे काम आमचे रिकूट पुढारी किती व कसे करीत असतात हे

पोलीस खात्यात चौकशी केल्यास सहज समजून येईल. कारण अशा लोकांचे पाठिंब्यानेच आम्हास निवडणुकी जिंकता येतील हा विश्वास या पुढाऱ्यांना असतो. असो. याबाबतीत लेखणी शिणविणे योग्य नाही. टीका टिपणी करून हा प्रश्न सुटणार नाही.

गेली २०–२२ वर्षे सरकारने तालुक्या-तालुक्यातून पगारी दारूबंदी प्रचारक नेमले आहेत. पोलीस खात्यात स्पेशल स्क्वाडस् ठेवली आहेत व त्यामुळे दारू न पिणाऱ्या लोकांचेवर अबकारी कराचे ओझे किती लादले गेलें आहे हे सामान्य माणसाचे लक्षात येत नाही. त्याला फक्त महागाई झाल्याचे जाणवते.

पूर्वी जास्तीत जास्त १० ते २० टक्के लोक दारू पीत असतील. आता त्यात कितीतरी पटीने भर पडलेली आहे. १० टक्के लोकांच्या बंदोबस्ताकरिता बाकीच्या निर्व्यसनी लोकांवर या कराचा बोजा काय म्हणून, याचा विचार व्हावा.

सरकारने दारुबंदी अयशस्वी झाली आहे हे प्रामाणिकपणे मान्य करावे व पूर्वी-प्रमाणे दुकाने उघडून गोरगरिबांना स्वस्त दारू पुरविण्याकरिता सबसिडी म्हणून द्यावी. म्हणजे दारुबंदीच्या प्रचारावर खर्च होणारा पैसा व बंदीकरता पोलिसांवर खर्च होणारा पैसा वाचेल.

दारू पिऊन दंगामस्ती करणारास कडक शासन करावे. दारू दुकानाबाहेर नेण्यास मनाई करण्यात यावी. स्त्रिया व मुले यांना दारू विकण्यात येऊ नये. मागास वर्गियांना–प्रामुख्याने आदिवासींना जंगलकार्यात काम पुरवावे...

२१ सप्टेंबर, १९७१ — अप्पा गोरे, खालापूर

[ खोपडी या भागात सध्या बंद झाली. पण 'अंगुरासव' म्हणून एक नवीनच माल बाजारात सुरू झाला आहे. व वाटल्यास मलाही तो आत्ता, दुपारी दोन वाजतादेखील मिळू शकेल असे अप्पा गोरे यांनी मला, मी या भागात चक्कर मारून आलो तेव्हा समक्ष सांगितले. साक्षीदार–शिरूभाऊ लिमये, जयवंत मटकर, गागोद्याचे जोशी व पुण्याचे प्र. गो. केतकर. दिनांक २२–९–७१ —संपादक ]

◻ काल रोजी 'उमरी बँक प्रकरण' पुन्हा काळजीपूर्वक वाचून पाहिले. त्यात श्री. पत्तेवार यांचे नाव ४–५ ठिकाणी आले आहे. वास्तविक पत्तेवार नावाचे कुणी गृहस्थ या ऑपरेशनमध्ये नव्हते. श्री. उत्तरवार यांचा त्यात प्रमुख भाग होता व उत्तरवार यांच्याऐवजी पतेवार असे माझ्याकडून अनवधानाने घडले आहे. चूक माझी आहे व त्यामुळे श्री. उत्तरवार यांच्यावर अन्याय होण्याची शक्यता असल्याने तसा खुलासा कृपया करावा.

२२ सप्टेंबर, १९७१ — सुधाकर डोईफोडे, नांदेड

मराठवाड्यातील
या हुतात्म्याचे स्मरण

# गोविंदराव पानसरे

एक दधिचि

**सुधाकर डोईफोडे**

माझ्या लहानपणातील ही गोष्ट.

दिवाळी २–४ दिवसांवर होती. सगळीकडे गडबड घाई चालली होती. लोक सजावटीत दंग होते. माझे वडील बैठकीला रंग देण्यासाठी डिस्टेंपरचे मिश्रण करीत होते. मी जवळच लुडबुडत होतो. तेवढ्यात कॉंग्रेसचे कार्यकर्ते आमच्याकडे आले. माझे वडील त्यावेळी जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे सेक्रेटरी वा कुणी असावेत. त्यामुळे त्यांच्याकडे असे कार्यकर्ते नेहमीच येत. पण आज आलेल्या कार्यकर्त्याचा चेहरा भयंकरच रडवेला दिसत होता. तो घाबऱ्या घाबऱ्या वडिलांना म्हणाला, 'गोविंदराव पानसरे गेले !'

'गेले ? कसे गेले ?' माझ्या वडिलांनी विचारले !

'मारलं, त्याला रझाकारांनी ठार केलं !' तो म्हणाला.

वडिलांनी लगेच रंगाचं साहित्य सोडलं. तशाच रंगलेल्या हातानं ते बाहेर पडले. मला मात्र हे गोविंदराव पानसरे कोण व त्यांना कशासाठी मारलं. हे त्यावेळी नीटसं समजलं नाही. कोणीतरी मोठा माणूस मारला गेला व काहीतरी अघटित घडलं हे मात्र जाणवलं.

त्या वर्षी या भागात दिवाळी साजरी झालीच नाही. त्यानंतर पुढील दोन वर्षही ती झा ली नाही. हैद्राबाद मुक्तिनंतरच या भागात खरी दिवाळी साजरी झाली.

२१ ऑक्टोबर १९४६ हा हुतात्मा पानसरे यांच्या हौतात्म्याचा दिवस. हौतात्म्य बऱ्याच प्रकारांनी मिळतं. मला कुणाची टिंगल करावयाची नाही परंतु दंगल करणाऱ्या, पळताना गोळी लागलेल्यांनाही आपण (राजकीय हेतूस्तव) हुतात्मे म्हणतो, समोरासमोर शौर्याने लढणाऱ्या व जगण्याची ५० टक्के शक्यता असलेल्या परंतु धारातीर्थी पडलेल्याला हुतात्माच म्हणतो. कै. पानसरे यांचे हौतात्म्य यापेक्षा

पृष्ठ ५३ वर

स्थळ : छबीलदास हायस्कूल, दादर
दिनांक : १२ सप्टेंबर १९७१
वक्ते : बाबासाहेब आमटे
विषय : सातपुड्यातील आदिवासींचा प्रश्न
आणि

# रचनात्मक संघर्ष

माझे परममित्र श्री. माजगावकर, सातपुडा सर्वोदय मंडळाचे अध्यक्ष भाऊसाहेब मुंदडाजी, धुळे जिल्हा सर्वोदय मंडळाचे श्री. बन्सीलालजी, ज्याच्यामुळे सातपुड्यातील रानपाखराची साद तुमच्यापर्यंत आली तो अंबरसिंग आणि उपस्थितांनो,

विनोबाजींच्या जन्मदिवसाच्या दुसऱ्या दिवशी कालच्याच ठिकाणी हा कार्यक्रम होत आहे, यात वैशिष्टय आहे. मी सातपुडा सर्वोदय मंडळाच्या संदर्भात काही बोलणार नाही, परंतु आपले मित्र अंबरसिंग यांच्या धुळे जिल्ह्यातील संघर्षाच्या निमित्ताने जे काही बोलले गेले, त्याच संदर्भात माझे विचार आपल्यापुढे मांडणार आहे.

वीस वर्षांपूर्वी माझ्या जीवनात तुळशीरामाचेनिमित्ताने रस्त्याच्या कडेला गटारात पडलेले जिवंत प्रेत आले. त्या महारोग्याते भीषण स्वरूप पाहून त्याच्या जीवनाची चौकशी केली. भंगीकाम करीत होतो, तेव्हा मानवी विष्ठेची घृणा आली नाही, किळस आली नाही. पण त्या जिवंत प्रेताची, ज्याच्या डोक्यातून भुजभुजत्या अळ्या बाहेर पडत आहेत त्या तुळशीरामाची भीती वाटली आणि विचार आला, या ठिकाणी माझा विकास असता, माझी साधना असती तर माझं पौरुष, माझं प्रेम कुठे असतं ? माझं मी मला आव्हान दिलं.

जिवंत प्रेतासारख्या जगणाऱ्या तुळशीरामाने माझी धुंदी उतरवून टाकली आणि म्हणाला, भीती असते तिथे प्रीती नांदत नाही. हा महारोगी रस्त्याच्या काठावर दिसला आणि निमित्ताचा दरवाजा उघडला गेला. दरवाजा बंद व्हायच्या आत, एकवीस वर्षांपूर्वी, आनंदवनाची सुरुवात केली. आज अंबरसिंगाची व्यथा पाहून समाजातील शतकानुशतके उपेक्षिलेली आदिवासी जमात दिसली. निमित्ताचा दरवाजा उघडला गेला आणि स्वतःशी एक प्रतिज्ञा केली. ही प्रतिज्ञा तुमच्यापुढे सांगणार आहे. मनाची अशी काही एक अवस्था असते की ज्यावेळी पब्लिक कमिटमेंट असतं, त्यावेळी Intense involvement करण्याची जिद्द चढते. मी ज्यावेळी कबुलीजबाब देतो की हे दुःख मला साहवत नाही, पाहवत नाही, त्यावेळी तरुण खांद्यावर म्हातारे डोके मिरवू शकत नाही. अशा जगात आपण राहातो, ज्यामध्ये ढगांचा चिखल तुडवत विजांशी हस्तांदोलन करीत एक पिढी आर्मस्ट्राँगच्या रूपाने

चंद्राच्या छाताडाला पाय लावून उभी राहते आणि ज्या देशात वन मॅन बाउंड्री फोर्स म्हणून गांधी उभा राहातो, त्या देशातला तरुण हा समाजाची जिवंत प्रेतासारखी स्थिती पाहू कशी शकतो ? महारोग्यांचं भलं करण्यासाठी म्हणून नव्हे तर भीती वाटली म्हणून मी या कामात पडलो. आज आंधळ्या मुलात प्रकाश पाहण्याची जिद्द उत्पन्न करण्यासाठी माझा तरुण मित्र उभा राहातो आहे. जर माझे मन तरुण असेल तर साऱ्या शक्तीनिशी मी या अंबरसिंगाला त्याच्या संघर्षात मदत करण्यासाठी धावून जात आहे. हा माझा मनोदय जाहीर करण्यासाठी मी येथे आलो आहे.

विचार भाषेतून व्यक्त केले जातात. पण पाण्यावरून बोट गेल्यावर जसे तरंग निघतात आणि विरून जातात, तसे आपण विचार ऐकून घेतो आणि विसरून जातो. आज, शेतामध्ये बुलडोझरने साऱ्या पाडाव्या असे मनावर कोरले जाणारे लिखाण करणारा माझा संपादकमित्र येथे आला आहे. माणुसकी त्याला जागी करती झाली. भूमिपुत्राच्या निमित्ताने खास अंक काढून ज्याने आपणांसमोर सच्चिदानंद उभा केला तो हा माझा मित्र. या माणसातील माणूस, मानसिक बधीरता ( Psychological anaesthesia ) आलेला समाज पाहिल्यानंतर जागा झाला व तो अंबरसिंगाकडे गेला. धुळ्याला जाऊन पोहोचला. तो रेस्ट हाऊसमध्ये उतरला नाही. अनेक मैल चालत तडक अंबरसिंगाकडे गेला आणि त्याच्यासह, पुन्हा, अन्याय करणाऱ्या माणसांचा पाठपुरावा केला. माझेकडे वर उल्लेख केलेला अंक आला व पत्र आले. सातपुडा सर्वोदय मंडळाकडून मला शेकडो मैल दूरवरच्या जंगलात माहिती मिळत होती. अशा तऱ्हेची आजची सभा गोविंदरावजी शिंदे घेत असल्याचे कळले आणि त्यामुळे कुतूहल निर्माण झाले. भिल्लांचा स्वर माझ्या कानी आला. नवी फेलोशिप निर्माण झाली. आज मी स्वतःला तरुण समजून ज्यांचे सारे जीवन कष्टात गेले, त्या आदिवासींच्या जीवनात त्यांच्याबरोबर काही करता येईल का याचा विचार करत आहे.

लेप्रसी इनहिबिलिटेशन या शब्दाचं स्पेलिंग माहीत नव्हतं, डॉक्टरी ज्ञानाचा गंध नव्हता त्यावेळी मी अंधारात उडी घेतली आणि अशी अनुभूती मला आली की हा अतिशय सुपीक असा अंधार होता. जीवनात कसे होईल, काय होईल, याचा डोक्यावरचे केस गळेपर्यंत विचार करत बसायचे नसते. सातपुड्याच्या दऱ्याखोऱ्यातील आदिवासीची साद जर तरुणाला रुंजी घालत नसेल, तर त्याचे इथे येणे व्यर्थ आहे; मुंबईच्या एका सहकारी संघाने सर्वोदय मंडळाला दिलेला चेकही निरर्थक आहे. आज अंबरसिंगाचे निमित्ताने निमित्ताचा दरवाजा उघडला आहे आणि तो बंद होण्याअगोदर माझी व्यथा, माझी तळमळ तुमच्यापुढे मांडण्यासाठी मी आलो आहे. या आदिवासींच्या गरजा तेथे जन्मायच्या आधी तीक्ष्ण नजरेच्या तरुण पिढीला दिसाव्यात. आमची दृष्टी अंधुक झाली आहे. आता यावेळी तुम्हाला हाका मारतो

आहे. मुंबईसारख्या शहरातल्या मुलांनी तेथे जायचे आहे. तुम्हाला माहीत आहे. कुत्रा शेपूट हलवतो : शेपूट कुत्र्याला हलवत नाही. मुंबईसारख्या शहरात शेपूट हलवल्याने ग्रामीण भागातला कुत्रा हलणार नाही. ग्रामीण भागातला कुत्रा ही शेपूट हलवेल तर खरी क्रांती. सध्या आपल्या शहरी नेतृत्वाची अवस्था म्हाताऱ्या अल्सेशियन कुत्र्यासारखी झाली आहे. हे नेतृत्व फक्त भुंकते, त्याला दात नाहीत- असे हे दंतहीन नेतृत्व काय क्रांती करणार ?

देशभर गांधीजींनी मिठाचा सत्याग्रह केला. त्यांच्या लढ्याने शेपूट हलवणारी शक्ती जागी झाली व मुंबईतही सत्याग्रह झाला. आज अंबरसिंगसारख्या माणसाने दऱ्याखोऱ्यातील सामान्य माणसामधील असामान्य पराक्रम जागा केला आहे. आज तो आदिवासी भिल्ल प्रश्नाच्या गाभ्याला हात घालतो आहे. आजच्या तरुण मलांची स्थिती एम्. ए. त फर्स्टक्लास मिळवणाऱ्या, ज्ञानेश्वरीवर प्रबंध लिहिणाऱ्या, पण 'गाय पान्हा चोरते म्हणजे नेमके काय ?' असे विचारणाऱ्या युवतीसारखी झाली आहे. आज त्यांची जीवनाशी फारकत झाली आहे. अशा मुलांना अंबरसिंगासारख्या माणसाबरोबर काम करायची जाणीव देण्याचे काम करण्यासाठी आलो आहे. रचनात्मक संघर्षाबाबत आज बोलणार आहे.

आजचा हा प्रश्न कसा सोडवावा याबाबत गोविंदराव शिंद्यांशी बोलताना स्पष्टता आली. परंतु त्याहीपेक्षा 'माणूस'ने ही ज्योत पेटवली आहे हे विसरता येणार नाही. Journalists are hypersensitive nerve-endings in the society. ज्याला तरल अशा भावना व संवेदना असतात व त्या व्यक्त करताना हर्ष असतो, तो पत्रकार. माणूसच्या संपादकांसारखे पत्रकार हे रामायण आणि महाभारत सोडून ग्रामायणाची कथा लिहितील. परंतु कार्यक्रम सांगण्यापेक्षा तो अंमलात आणणे कठीण असते.

कॉलेजयुवकाचे एखादीशी पन्नास टक्के प्रेम जमते. वक्त्याची वक्तृत्वाशी गाठ पडते कर्तृत्वाशी शून्य. तेव्हा नुसता कार्यक्रम समजून चालणार नाही. तो अमलात आणण्यासाठी कर्तृत्व हवे. रचनात्मक संघर्षाची रूपरेषा समजून घेऊन तो निश्चित स्वरुपात अंमलात आणायचा आहे.

गांधी व विनोबांनी रचनात्मक कार्य केले. रचनात्मक कार्य म्हणजे Mass contact through constructive work. पण स्वराज्यानंतर खादी कमिशन, महारोगी सेवा समिती, तारिणी संघ यांनी काय केले ? या सर्व संस्था केवळ विधायक कार्य करीत बसल्या. राजकारणाशी फारकत घेऊन यांनी कामे केली. राजकीय पक्षांचे काय झाले ? ते विधायक कार्यापासून दूर बसले. काही वर्षांपूर्वी आचार्य – जावडेकरांशी बोलताना मी म्हटले होते की राजकारणाशिवाय विधायक कार्य नपुंसक आहे व विधायक कार्याव्यतिरिक्त राजकारण वांझोटे आहे. मी एकाकीपणे जंगलात निघून गेलो आहे व निरीक्षण करतो आहे. असे दिसत आहे

की, राष्ट्रीय प्रश्नांची धूळधाण झाली असून विधायक कार्याची नासाडी झाली आहे. माझा वर उल्लेखलेला सिद्धांत नियतीने सिद्ध केला आहे. मी परवा थट्टेने एका लेखाबद्दल बोलताना म्हटले, ' It twits the tail of the truth. ' बैल जागचा हलत नसला की त्याची शेपटी पिरगळायची असते. मग तो चौखूर उधळतो. संघर्षाशिवाय विधायक कार्य नपुंसक आहे.

कार्यक्रमाची आखणी करताना हे ध्यानात ठेवायला हवे की This generation is restless for results. काही नाही. आत्ताच झाले पाहिजे. पाच सेकंदात तयार होणारी इन्स्टंट कॉफी पाहिजे. शंभर वर्षांनंतर मिळणारे रिझल्टस् चालणार नाहीत. अपघात झाला आणि रक्तस्राव सुरू झाला की होमिओपाथी ट्रीटमेंट देऊन चालत नाही. ताबडतोब रक्त द्यावे लागते. ते दिले नाही तर रोगी दगावतो. आज देशाची परिस्थिती अशीच झाली आहे. मधुमेह झालेला रोगी असतो. नातवाच्या बारशाच्या जेवणात जिलब्या, लाडू खातो. मागाहून इन्शुलिनचे इंजेक्शन घेतो. तेवढ्यापुरते साखरेचे ज्वलन होण्यास मदत होते, परंतु तेवढ्याने रोगी बरा होत नाही. रोगी हा रोगीच राहातो. जखम चिघळली तर ती तेवढ्यापुरती कापून टाकतात, पायही तोडून टाकावा लागतो. पण Patient remains sick.

समाज आजारी आहे, या म्हणण्याबाबत कोणाचेही दुमत नाही. पण औषध काय ? कुणी आपल्या मनाने अहिंसात्मक विधायक कार्य हा उपाय सुचवतात तर कुणी प्रस्थापितांविरुद्ध संघर्षाशिवाय दुसरा पर्याय नाही असे सांगतात. डॉक्टर चिठी लिहून देतो पण औषध कुठे मिळेल ते सांगत नाही. बाजारात कुठेही ते औषध मिळत नाही. जो समाजाच्या आजाराचे निदान करतो, औषध देतो आणि कुठे आहे ते सांगतो तो खरा डॉक्टर. आज तरुण पिढीने समाजाला प्रिस्क्रिप्शन द्यायचे आहे ते रचनात्मक संघर्षाचे.

भमरागडच्या माडिया गोंडांचा आणि सातपुड्यातील भिल्लांचा प्रश्न यासारख्या वेगवेगळ्या निमित्तांनी विधायक कार्याची ग्रासरुट्स् फत्तराचे स्नायू कापत समाजाच्या वेगवेगळ्या थरात जायला हवीत. काकडीच्या रोपाची काहीशी चपटी गुलाबी मुळे श्रद्धेने, ऐटीने दगडांच्या कडा फोडत एकेक कण पुढे जातात. तशी ही युवाशक्ती आपल्या गुलाबी मुळांची ताकद आजमावत कड्याकपारीत जाईल, माळरानावर नंदनवन फुलवेल.

वऱ्हाड झाल्यावर सासरी जायला निघालेल्या, जरतारी शालू नेसलेल्या खाली मान घालून बसलेल्या नववधूची चंद्रदर्शनाचे वेळी सासरच्या मंडळींशी ओळख करून देण्यात येत असते. परंतु तिचे त्याकडे लक्ष नसते. तिला ओढ असते आपल्या प्रियकराची. त्या वातावरणाचे दुःख भोगत गुढग्यात मान घालून रडत बसलेल्या त्या युवतीचे रूप किती सुंदर, मोहक दिसते. या नववधूसारखी खेड्यांमध्ये, स्लम्समध्ये आसवांचे मुंडावळे बांधलेली शतकानुशतके गुढग्यात मान घातलेली कोणी-

तरी तरुणी माझा प्रियकर आता येईल आणि घेऊन जाईल अशी आशा बाळगून बसलो आहे. पण हा प्रियकर सासरी घेऊन जातच नाही. त्याच्या मनाची एक बाजू मखमली, निःश्वासी असते (it is soft as campassion) परतु दुसरी बाजू गतानुगतिक परिस्थितीप्राप्त जीवन जगण्याची' म्हणजे चौकटीतील असते. मखमली निःश्वासी बाजू तो मारून टाकतो.

माझ्या भोवतालचे दुःख मी सहन करणार नाही, माझी बुद्धी, माझी ताकद आणि माझे संवेदनशील मन यानिशी माझ्याच्याने जास्तीत जास्त होईल तितके करीन अशी प्रतिज्ञा करून ती व्यवहारात उतरावयाचा प्रयत्न करणारे युवक जर का या विवंचनेत सापडलेल्या तरुण पिढीत तयार होणार नसतील तर सगळीकडे विहार बंगाल झाल्याशिवाय राहणार नाही. नक्षलवाद्यांच्या देशभक्तीबद्दल शंका नाही, घ्यायचे कारण नाही, त्यांचा रस्ता चुकीचा आहे एवढे निश्चित. नक्षलवादी चळवळीसाठी आपले जीवन समर्पित करणारा, फुफ्फुस फाटल्यामूळे ऑक्सिजनचे सिलिंडर जवळ बाळगून नाकात नळी घालून श्वासोच्छवास करणारा चारू देश-द्रोही ? मला त्याची चिंता वाटत नाही. चिंता वाटते ती या राजकीय शिखंड्यांची, गरीब हा गरीब होत आहे व श्रीमंत आणखी श्रीमंत होत आहे अशी भाषणे ठोकणाऱ्यांची. अरे बडबड्यांनो, हा देश कुणाचा आहे ? तुमचा आहे ना ? मग हे डोळ्यादेखत घडत असताना तुम्ही काय करता ? मित्रांनो, या राजकीय शिखंड्यांचे हाती देश सुखरूप नाही. ही परिस्थिती बदलायची असेल, तर रचनात्मक कार्याचीच कास धरावी लागेल.

पन्नाशी उलटल्यावर एकट्याने पन्नास हजार मैलांची यात्रा भूदानासाठी करणारे विनोबा. आता त्यांना काय केले असे विचारून हिणवू नका. तुम्ही काय करणार आहात बोला. विनोबांच्या बळकट खांद्यावर उभे राहून पुढचे पहा. कार्यक्षेत्र निवडून तुमच्या कार्यक्षेत्राच्या ऑर्बिटमध्ये तुम्हाला वजनरहित अवस्थेत फिरावे लागणार आहे. तरुण तो, जो रस्ता शोधून काढतो. सापडला नाही तर मनात हरवतो. दुसऱ्याबद्दल तक्रार करण्याऐवजी स्वतःमध्ये सुधारणा करतो. सकाळपासून संध्याकाळपर्यंत आपल्या पोटात पत्रे घेणाऱ्या पोस्टाच्या पेटीसारखी जीवन ही तक्रारपेटी असल्याचे मानणारा तो युवक कसला ? तरुण तो, जो संकटाचा उपहास करीत खदखदा हासत पुढे जातो, Dignity of labour जाणतो, Dignity of danger जाणतो. लक्षात ठेवा, अंधःकारही कित्येकदा काजव्यासारखा चमकतो. राखेतूनही नवा पक्षी उठतो. प्रभूचे हजार हात टॅलेंटच्या मागे गेले नाहीत. टाचा मारत घोडे पुढे नेले नाही तर ते 'विन'मध्ये जाऊ शकत नाही. हरदासी तट्टूवर बसून रेसकोर्सवरची शर्यत जिंकता येत नाही.

रचनात्मक कार्य करताना इंच इंच जागेवर पाय रोवून अन्यायाविरूद्ध छातीचा कोट करावा लागतो. तरुणांनो, संवेदनाचा शर पुन्हा भात्यात टाकून धनुष्याची

प्रत्यंचा ओढायची वेळ आता आली आहे. तरुणी कुरळ्या बटांशी चाळा करत राहते, असा चाळा किती वेळ तुम्ही प्रत्यंचेशी करणार? भिल्ल तिरकमठ्यावर पोलादी शर चढवतो. त्याचेजवळ तंत्र असते. तो बाणाचे टणत्कार करतो. आज तुमच्याकडे किरणोत्सर्गी प्रकाशलहरींची प्रत्यंचा आहे. ग्रीन रेव्होल्यूशन तुमच्या हाताशी आहे. तरीही कार्याचा योग तुम्ही आणू शकत नाही. मित्रांनो, योग येत नसतात, आणायचे असतात. संधी मिळत नसते, मिळवायची असते.

देशात उद्या नवा साक्षात्कार झालेला पाहावयाचा असेल तर, अंबरसिंगासारख्या निरागस नेतृत्वाबरोबर त्याच्या खांद्याला खांदा लावून लढायला जावे लागेल. तुम्ही जाल अशी मला आशा आहे. कष्टणारी काळी यमुना आणि बुद्धिमान शुभ्र गंगा यांचा संगम होऊ द्या. लाल, पांढऱ्या, भगव्या रंगांच्या पाण्याच्या वेगवेगळ्या तळावांमध्ये पाठीला भोपळे लावून डुबुक डुबुक करणाऱ्या लोकांचे स्विमिंग पूल सोशालिझमचे प्रयोग बस झाले. माझे एक क्षेत्र आहे आणि त्यात मी तळापर्यंत सूर मारतो आहे या जिद्दीने पेटणारे, धडपडत पडत पुढे जाणारे, रचनात्मक संघर्ष हा मार्ग असलेले युवकच क्रांती करू शकतील.

सध्याच्या राखेतून पुढची पिढी निघेल. या राखेत लपलेली आरती पाहा. ही गांधींजींची, सुभाषबाबूंची आरती आहे. भगतसिंग राजगुरूसारख्या शहीदांचे निखारे आहेत. वेळीच दखल घेणार नसाल तर ही लपलेली आरती सातपुड्यात वणवा भडकावील. त्यावेळी बाबा आठवतील. ध्यानात असू द्या की बाबा आमटे वणव्याला भीत नाही...

प्रेषक : दिलीप जोशी

# विनंती

२०।९।७१ रोजी एक मनीऑर्डर रु. ५५-०० ची आमचेकडे जमा झाली आहे. पण चुकीमुळे ती रक्कम पाठविणाराचा पत्ता लिहून घ्यावयाचा राहिला आहे. त्यामुळे सदर रक्कम कोणी पाठविली हे समजावयास मार्ग नाही. मनिऑर्डरचा नंबर ९०६६ व मनिऑर्डर केल्याची तारीख १६-९-७१ आहे. तरी ही रक्कम ज्या कोणी पाठविली असेल त्यांनी सत्वर पत्र टाकावे. व मूळ पावती पाहाण्यासाठी पाठवावी. म्हणजे रक्कम योग्य खात्यास जमा करता येईल.

— व्यवस्थापक

अरुण गोसावी

## मुंबई वार्ता

# शंकरराव चव्हाणांचा नवा पवित्रा काय सुचवतो ?

भीषण दुष्काळाचे सांवट थोडचा पावसामुळे हटत आहे असे दिसताच महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाचा मागे पडलेला वाद आता पुन्हा उफाळून वर आला आहे. नेते लोक तोंडे उघडू लागले आहेत. ठिकठिकाणचे गट मोर्चेबंदी करू लागले आहेत. निरोपांची देवाण–घेवाण जोरात सुरू झाली आहे, हा आपला, तो त्याचा अशी डोकेमोजणी केव्हाच चालू झाली होती. आता टोप्यांच्या दिशा आणि रंग निश्चित होत आहेत. विरोधी पक्षसुद्धा अमुक हवा, तमुक नको, अशी केविलवाणी फरमाईश करू लागले आहेत. थोडक्यात म्हणजे कॉंग्रेसने निवडणूक जिंकली असे गृहीत धरून नेतेपदासाठी लंगोटा कसणे आतापासूनच सुरू झाले आहे.

जरा मागे पडलेल्या या विषयाला नव्याने तोंड फोडले ते खुद्द यशवंतराव साहेबांनीच. दुष्काळी दौऱ्यातूनच त्यांनी औरंगाबादेत चक्क सांगून टाकले की वसंतरावच महाराष्ट्राच्या नेतेपदी कायम राहणार. 'आमच्या दोघां'मध्ये वैर पेरणाऱ्यांना लगोलग इशाराही त्यांनी देऊन ठेवला.

लगोलग मराठवाडचाच्या लोकांनी कंबरा कसल्या, आवाहने केली, बैठकी घेतल्या, ठराव केले आणि यावेळी तरी मुख्यमंत्रीपदाचे कुंकू आमच्याच भागाला लागले पाहिजे म्हणून जोरदार आवाज उठविला. कोकण थंड आहे. कारण कोकणात मराठवाड्यासारखा जोमदार कॉंग्रेस गट नाही. विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्रातल्या कार्यकर्त्यांच्या जरी अशा आवाजी हालचाली चालू नसल्या तरी नेतेलोकांची मोर्चेबंदी चालू आहे.

यशवंतरावांनी हे मोहोळ असे का बरे उठवावे? पुणे–मुंबई धरून अखिल महाराष्ट्रातील यच्चयावत दैनिके यशवंतरावांच्या 'बाणेदार स्पष्टवक्तेपणाचे आणि निःसंदिग्धपणा'चे वारेमाप कौतुक करीत असली तरी त्यांची लागोपाठ दोन भाषणे ऐकणाऱ्याला यशवंतराव किती हुशारीने, श्लेषात्मक आणि सफाईने बोलून शब्दात न सापडण्याची काळजी घेतात ते कळून येईल. दोन महिन्यापूर्वी मुंबईत केलेल्या एका भाषणात त्यांनी श्री. वसंतराव नाईक यांच्याविषयी बोलताना अशा काही कोलांट उड्या मारल्या की थक्क व्हावे. परवा औरंगाबादेत ते बोलले त्याचे

रिपोर्टिंग जरी ' मुख्यमंत्रीपदी वसंतरावच राहणार ' अशा ठळक मथळयाखाली झळकले असले तरी वस्तुस्थिती जरा निराळी असल्याचे कळले. असे म्हणतात की, यशवंतरावांनी आपल्या भाषणात वसंतरावांची जोरदार भलावणी केली. महाराष्ट्रात ' असेच नेतृत्व ' कायम राहणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली. ही ग्वाही देताना वसंतरावांचे नाव मात्र त्यांनी घेतले नाही.

ते काहीही असो. यशवंतरावांना जरी वाटत असले तरी ते आपले मत एवढया उघडपणे आणि इतक्या लवकर बोलून दाखविणार नाहीत हे सर्वांना माहीत आहे. मराठवाडयात एवढी जोरदार लॉबी तयार होत आहे हे स्पष्ट दिसत असताना तर एवढे ' दे घाव-दोन तुकडे ' थाटाचे धाडसी वक्तव्य करणारांपैकी ते नव्हेत. कुणाला दुखवायचे नाही; आणि सर्वांना बरोबर घेऊन चालायचे; हे त्यांचे धोरण त्यामध्ये हे बसत नाही.

गेल्या दहा वर्षांत श्री. यशवंतराव चव्हाण हे महाराष्ट्राच्या राजकारणाचा मानबिंदू होऊन बसले आहेत. त्यामुळे येथील कॉंग्रेसी राजकारणाची केव्हाही चर्चा करताना यशवंतरावांचा संदर्भ आलाच पाहिजे. ओघानेच त्यांचे राजकारणपटुत्व, त्यांची हुशारी, त्यांचा धीमेपणा, ओघवते वक्तृत्व, राजकीय दूरदृष्टी आदी गुणांची प्रशंसायुक्त चर्चाही करायलाच हवी. त्यामुळे त्यांच्या एकेका शब्दाचा श्लेष काढण्यासाठी विद्वान मराठी संपादकांनी पोत्यांनी अग्रलेख लिहून आपल्या लेखण्या झिजवाव्यात यात नवल नाही. (या वार्तापत्रांमध्येदेखील अपरिहार्यपणे हे घडतेच) पण त्याला इलाज नाही. महाराष्ट्राचे (कॉंग्रेसी) राजकारणच तसे आहे. यशवंतराव हा परवलीचा शब्द आहे.

पण प्रश्न असा आहे की, नवकॉंग्रेसमध्ये आता नव्याने सुरू झालेल्या वादळी

पृष्ठ ४७ वर

## वर्गणीदारांस सूचना

वर्गणीदारांना दिवाळी अंक वर्गणीतच दिला जातो. ज्यांना दिवाळी अंक रजिस्टर पोस्टाने पाहिजे असेल त्यांनी आमचेकडे १ रु. पाठवावा.

अंक व्यवस्थित मोजून पोस्टाचे ताब्यात दिले जातात. तरीही अंक न मिळाल्यास प्रथम स्थानिक पोस्टाकडे चौकशी करावी. तेथे लेखी तक्रार द्यावी व तक्रारीची एक प्रत आमचेकडे पाठवावी. अंक शिल्लक असेल तर अवश्य पाठवू.

**ज्यांची वर्गणी ९ ऑक्टोबरपूर्वी संपत असेल त्यांनी वार्षिक वर्गणी लगेच रवाना करावी. म्हणजे त्यांना दिवाळी अंक देता येईल.**

व्यवस्थापक : **साप्ताहिक माणूस**

# चाकावरचे विचार

श्री. मा. भावे

## हेही संपत्तीचे असंस्कृत प्रदर्शनच

सत्तारूढ कॉंग्रेसचे चिटणीस श्री. इंद्रजित यादव यांनी आपल्या तरुण तुर्की प्रवृत्तीस शोभतील असे विचार नुकतेच मुंबईत व्यक्त केले. संपत्तीचे 'असंस्कृत' प्रदर्शन जेथे होत असेल तेथे कॉंग्रेस स्वयंसेवकांनी निदर्शने करावीत अशी सूचनाही त्यांनी केली.

अकलूज येथाल प्रसिद्ध लग्न समारंभापासून संपत्तीच्या प्रदर्शनाविरुद्ध लोकमत तयार करण्याचे कार्य वृत्तपत्रे व नेते यांनी हाती घेतले असावे असे दिसते. परंतु ज्याप्रकारे हे विचार व्यक्त होत आहेत व ज्या पद्धतीने असे विचार आजपर्यंत मांडले गेले आहेत त्यावरून काही गफलत होत असावी असा संशय येतो.

पहिली गोष्ट अशी की 'संपत्तीचे असंस्कृत प्रदर्शन' या शब्दप्रयोगात काय अभिप्रेत आहे याचा नक्की उलगडा होत नाही. बहुसंख्य पुढाऱ्यांची गलेलठ्ठ शरीरे व सुटलेली पोटे हे देखील संपत्तीचे असंस्कृत प्रदर्शनच मानले पाहिजे. अनेक नेत्यांचे दैनंदिन जीवन—मग ते सत्तेवर असोत अगर नसोत—हेच मुळी संपत्तीचे 'असंस्कृत' प्रदर्शन असते. श्रीमती इंदिरा गांधी व श्री. निर्जलिंगप्पा यांच्या प्रसिद्ध भोजनातील खाद्यपदार्थांची यादी अजूनही अनेकांच्या ध्यानात असेल. श्रीमती गांधी रोज कोणत्या ना कोणत्या महत्त्वाच्या पुढाऱ्यासमवेतच भोजन करीत असतात. असा श्रीमंती व अनारोग्यकर आहार रोज घेणे हेही संपत्तीचे असंस्कृत प्रदर्शनच नव्हे काय ?

दुसरे असे की संपत्तीचा उपभोग हा समाजवादाला शोभणारा नाही, असेही नाही. संपत्तीच्या उपभोगाविषयी समाजवादाला काहीही म्हणावयाचे नाही. समाजवादात मुख्यतः संपत्तीचे उत्पादन व वाटप याविषयीचे विचार आहेत. समाजवाद म्हणजे गांधीवाद नव्हे. विरक्ती, साधी रहाणी, खादी या कोणत्याही गोष्टी समाजवादाला अभिप्रेत नाहीत.

म्हणूनच तर अनेक समाजवादी नेते—मग ते कम्युनिस्ट समाजवादी असोत वा लोकशाही समाजवादी असोत—सर्व सुखे मनमुराद उपभोगतात. श्री. जॉर्ज फर्नांडिस मधुचंद्रासाठी युरोपात जातात, श्री. डांगे कधीही हिंदी डॉक्टरांची औषधे घेत नाहीत आणि श्री. कृष्ण मेनन यांनी कधीही रेल्वेने प्रवास केला नाही. आपल्या महाराष्ट्रीय पुढाऱ्यांनी तरी उपजीविकेसाठी कधी कोणता उद्योग केला आहे ? तरी बहुतेकांच्या मालकीची प्रशस्त घरे मोक्याच्या ठिकाणी बांधलेली आढळतात.

कोणी म्हणतील की समाजवादी पुढाऱ्यांची वर उल्लेखिलेली वर्तणूक 'असंस्कृत

प्रदर्शन ' या सदराखाली घालता येणार नाही. परंतु जेव्हा देशात ७॥ कोटी गाळे बांधण्याची आवश्यकता आहे, १०० स्कूटर्ससाठी १५००० माणसे रांगेत उभी राहावीत इतकी वाहनांची टंचाई आहे, १०–१० मैलांत डॉक्टर मिळत नाही असे भाग देशात आहेत असे आपण वाचतो जेव्हा वरील वर्तन ' संपत्तीचे असंस्कृत प्रदर्शन 'च ठरते तेव्हा संपत्तीच सामान्य जनतेजवळ नाही अशी स्थिती असते तेव्हा केवळ संपत्ति जवळ बाळगणे हेही असंस्कृत ठरते.

कदाचित् हे लोकांच्या लक्षात येऊ नये यासाठीच इंद्रजित यादव यांची वर उल्लेखिलेली आरोळी असेल ! ◻

## सहज आठवले म्हणून

श्री. प्र. बा. गजेंद्रगडकर, सर्वोच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायाधीश, यांची भारत सरकारने विधी-आयोगाचे प्रमुख म्हणून नुकतीच नेमणूक केली. श्री. गजेंद्र-गडकर हे मुंबई विद्यापीठाचे उपकुलगुरु आहेत. भारत सरकारने स्थापलेल्या कर्मचारी–आयोगाचे ते अध्यक्ष आहेत. काश्मीरमधील परिस्थितीची चौकशी करण्यासाठी सरकारने नेमलेल्या मंडळाचे तेच अध्यक्ष होते. बनारस हिंदु विद्यापीठाची चौकशी त्यांनीच केली. महाराष्ट्र सरकारने अखिल भारतीय सेवा परीक्षात महाराष्ट्रीय विद्यार्थी का उत्तीर्ण होत नाहीत याची चौकशी करण्यासाठी जे मंडळ नेमले त्यावरही श्री. गजेंद्रगडकर होतेच.

श्री. गजेंद्रगडकर हे काही एकमेव निवृत्त सरन्यायाधीश नाहीत. श्री. सुब्बाराव, श्री. शहा व श्री. हिदायतुल्ला हे माजी सरन्यायाधीशही हयात आहेत. ते श्री. गजेंद्र-गडकर यांच्यापेक्षा वयानेही कमी आहेत. त्यांची कार्यक्षमता श्री. गजेंद्र-गडकर यांच्यापेक्षा कमी असेल असेही मानण्याचे कारण नाही.

वृद्ध माणसे उच्चाधिकाराच्या जागा अडवून बसतात, तरुणांना वाव मिळत नाही, त्यांनी स्वेच्छेने निवृत्त होऊन तरुणासाठी जागा करून दिली पाहिजे ही मागणी गेली कित्येक वर्षे होत आहे. पंतप्रधान व त्यांचा गोतवळा या मागणीला प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष पाठिंबाही देत आला आहे. असे असता श्री. गजेंद्रगडकर यांच्यावर ही जबाबदारी का टाकली जात असावी ?

' इकॉनॉमिक अँड पोलिटिकल वीकली 'च्या १९७० च्या वार्षिकात भारतीय सरन्यायाधीशांच्या निर्णयाचा अभ्यास करणारा एक लेख आला होता. त्यात स्वतंत्र निर्णय घेण्याच्या निकषानुसार सरन्यायाधीशांचे क्रमांक लावले होते. त्यात श्री. गजेंद्रगडकर यांचा क्रम शेवटचा लागत होता.

अर्थात् वरील गोष्टीचा संबंध श्री. गजेंद्रगडकर यांच्या उच्चस्थानावर सतत होणाऱ्या नेमणुकांशी असेलच असे नाही. आपले आठवले म्हणून सांगितले ! ◻

## प्रा. रजनी कोठारी

हर्बर्ट स्पेन्सरविषयी असे म्हणतात की त्याच्या वैयक्तिक आवडी-निवडींचेच

त्याने एक तत्त्वज्ञान बनविले. परंतु हे म्हणणे अधिक तत्त्वज्ञान्यांच्या संदर्भात व अनेक शास्त्रांच्या संबंधीही खरे आहे. कोणतेही तत्त्वज्ञान अगर समाजशास्त्रांतील विचार काही विशिष्ट सामाजिक परिस्थितीतच उगम पावतात. परंतु ते विचार जेव्हा तात्कालिक सामाजिक मूल्यांच्या व परिस्थितीच्या पलीकडे जातात तेव्हाच ते तत्त्वज्ञान म्हणून वा समाजशास्त्रांतील विचार म्हणून स्वीकार्य होतात. कवितासुद्धा व्यक्तिगत अनुभवातूनच स्फुरते परंतु जेव्हा ती त्या अनुभवाला सार्वत्रिकता देऊ शकते तेव्हाच वाचनीय बनते.

त्यामुळेच शास्त्रीय विचार मूल्यनिरपेक्ष असतो. तो चांगला अगर वाईट असा असू शकत नाही. तो फक्त सुसंगत किंवा विसंगत असतो. त्या विचाराचे सामाजिक, राजकीय वा आर्थिक परिणाम काय होतील किंवा त्या विचारांना राज्यसंस्थेचा, धर्मपीठाचा अगर जनतेचा पाठिंबा आहे की नाही याचा विचार शास्त्रज्ञ करीत नाही.

परंतु पाश्चात्य देशातील विद्यार्थी नेते, त्यांचे मार्क्यूजसारखे विचारदाते आणि वरील दोन्ही वर्गांचे एतद्देशीय चहाते यांना वरील विचार मान्य नाहीत. शास्त्रीय विचारांना मूल्यांच्या कक्षेत बसविले पाहिज असा त्यांचा आग्रह असतो. प्रा. राम बापट यांनी काही दिवसांपूर्वी याच संदर्भात ' शास्त्राला माणुसकीचा डोळा दिला पाहिजे ' असे म्हटले होते.

अशाच स्वरूपाचे काही विचार प्रा. रजनी कोठारी यांनी गोखले अर्थशास्त्र संस्थेपुढील व्याख्यानात व्यक्त केले. मूल्यविरहित व राजकीय-परिस्थितिनिरपेक्ष अर्थशास्त्रीय विचार अधिक सूक्ष्म बनतील व त्या विचारांच्या साहाय्याने निघणारे निष्कर्ष अधिक काटेकोर असतील हे खरे, परंतु ते विचार व निष्कर्ष महत्त्वपूर्ण ( Significant ) असणार नाहीत, असे ते म्हणाले.

त्याचे हे विधान खरे आहे. परंतु त्यात अभिप्रेत असणारी धमकी तितकीशी सोज्वळ नाही. ती धमकी अशी की सध्या वहाणाऱ्या समाजवादी विचारांना साथ देतील असे निष्कर्ष जर अर्थशास्त्रज्ञांनी काढले नाहीत तर त्यांचे महत्त्व संपुष्टात येईल. कदाचित् नेमके हेच प्रा. कोठारी यांना म्हणावयाचे नसेल, पण कित्येक पोटार्थी अर्थशास्त्रज्ञ असा समज करून घेतीलही.

पुणे विद्यापीठाचे उपकुलगुरू श्री. बा. पां. आपटे वरील धमकी अधिक उघड शब्दात देतात. मागे गणित शिक्षकांच्या मेळाव्यात बोलतांना ते म्हणाले की, आपल्या शास्त्र-शाखेच्या विकासासाठी पैसे हवे असतील तर त्या शास्त्राची समाजाला असणारी आवश्यकता पटवून दिली पाहिजे. याचाच अर्थ असा की शिक्षकांनी सेल्समनशिप अंगी बाणवून घेतली पाहिजे.

थोडक्यात म्हणजे शास्त्रीय विचारांना व शास्त्रज्ञांना जगावयाचे असेल तर त्यांनी प्रस्थापित सत्तास्थानापुढे लांगूलचालन केले पाहिजे.

मार्क्यूज, कोहेन बेन्डिट व त्याचे साथीदार, प्रा. एम. बापट व कोठारी आणि डॉ. आपटे ही सर्व मान्यवर मंडळी आहेत पण त्यांच्या उक्तींचा भारतीय व्यवहारात अर्थ हाच होत नाही का ?

□ □ □

सल्ला सर्वांचा पण निर्णय आमचा

# कृतिसमितीच्या कार्यामुळे वाढलेल्या अपेक्षा

**प्रतिनिधी**

परळ, गिरणी कामगार वस्तीचा भाग. बालेकिल्लाच म्हणा ना ! याच विभागात एक छोटीशी खोली. एका गिरणी कामगार स्त्रीच्या मालकीची. कामगार स्त्रीच्या घरात थाटमाट तो काय असणार ? एक कॉट, एक उंच स्टूल आणि चटई पसरलेली. या चटईवर काही साधीसुधी माणसं बसलेली आहेत. स्वतः कापडाच्या गिरण्यांत काम करतात, पण यांचे कपडे साधेच, मळलेले. काहींच्या दाढ्या बोटभर वाढलेल्या. पण यांच्याशी कोणालाच काही कर्तव्य नाही. स्वतःचे प्रश्न स्वतःच्याच हिंमतीवर, एकजूटीच्या शक्तीवर सोडवायचे हाच यांचा निर्धार. त्यांची दक्षताही अफाट. कृतिसमितीचे सदस्य, काहीना काही गाऱ्हाणी वा प्रश्न घेऊन आलेल्या कामगारबंधूंची ती खोली म्हणजे श्रद्धास्थान झाली आहे. ' राष्ट्रीय मिल मजदूर संघा 'च्या ' आंबेकर मंझील 'चा भपका येथे नाही, की संघाचे सरचिटणीस श्री. देशपांडे यांच्याप्रमाणे कृतिसमितीच्या पदाधिकाऱ्यांना मोठ्या, आरामशीर चेंबर्स व खाजगी चिटणीस वगैरेंची सोय उपलब्ध नाही. एवढेच काय, साम्यवादी पक्षप्रणित ' मुंबई गिरणी कामगार युनियन 'च्या दळवी बिल्डिंगमध्ये उपलब्ध असलेल्याही सोयी तेथे नाहीत. पण हे सारे असले म्हणजेच प्रश्न सुटू लागतात असे बिलकुल नाही.

मी तेथे गेलो तेव्हा दहा-बारा कामगारबंधू काहीतरी चर्चेत गुंग होते. क्षणभर माझी दखल घेतली गेली आणि ते पुन्हा चर्चेत गुरफटून गेले. पाच मिनिटांनी ते सारे आटोपून ओळखदेख आणि चर्चा यांना सुरुवात झाली.

१९६९ च्या बोनस प्रश्नाचा लढा गेल्या वर्षीच्या ऑक्टोबरात अगदी ऐन निकरावर आला होता. राष्ट्रीय मिल मजदूर संघ मारुया मारीत बसला होता. ' मुंबई गिरणी कामगार युनियन 'चे ' लढावू ' नेते व कार्यकर्ते परळची पोटनिवडणूक लढविण्यात गर्क होते. अशा वेळी काही गिरण्यात मागण्याचे प्रश्न लढविण्यासाठी कामगार समित्या स्थापन झाल्या.

इतर क्षेत्रातील कामगारांपेक्षा गिरणीकामगार हा पूर्वीपासून अधिक संघटित.

त्यांच्या चळवळी इतरांना आदर्शवत ठरत. पण आज त्यांची अवस्था अत्यंत दयनीय आहे. 'राष्ट्रीय मिल मजदूर संघ' ही गिरणीकामगारांची प्रातिनिधिक युनियन खरी; पण बहुसंख्य कामगार संघाला विटले आहेत. 'मुंबई गिरणी कामगार युनियन'चे नेहमीचे पवित्रे लढाव्, पण त्यांची सदस्यसंख्याही तशी मोठी नाही शिवाय प्रातिनिधिक संघटनेशिवाय इतर युनियन्सनी सदस्यत्वाच्या पावत्या फाडा-यच्या म्हणजे असे काम करणाऱ्या कामगारांची भरलीच. त्यांच्यावर चार्जशीट आलेच. यालाच कामगार फाशीची शिक्षा म्हणतात. कारण वेळप्रसंगी कामावरून दूरही केले जाते. तेव्हा या व्यवसायातील कामगार तसा विस्कळीतच झाला होता.

या पार्श्वभूमीवर गिरणीगिरणीत समित्यांची स्थापना झाली. वेगवेगळ्या पक्षांकडे कल असलेले, सर्व मतांचे व निरनिराळ्या संघटनांना मानणारे कामगार, हे सारे विसरून कोणतेही राजकीय व्यासपीठ नको, प्रश्न सोडविणे महत्त्वाचे आहे हा विचार करून एकत्र आले.

सुरुवातीलाच टेक्स्टाईल, व्हिक्टोरिया आणि इंदु गिरणी क्र. १ या गिरण्यांत समित्यांनी स्वतःच्या जोरावर लढे केले. एक-दोन ठिकाणी पूर्ण यश मिळाले तर एका ठिकाणी संप तडजोडीने मिटला. मुंबईतील ५८ कापड गिरण्यांपैकी सुमारे ३५ गिरण्यांत ही शक्ती उभी राहिली. विशेषतः बंद गिरण्यांतील कामगार फारच अॅक्टिव्ह. रामनवमी—३ एप्रिल या दिवशी या सर्व गिरण्यांतील कामगार समित्यांत एकसंधपणा आणण्यासाठी कृतिसमितीची स्थापना झाली. १३ एप्रिलला त्यांनी कामगार मैदानावर मेळावाही भरविला होता.

'सल्ला सर्वांचा पण निर्णय आमचा' हे कृती समितीचे घोषवाक्य आहे. एखादा कामगार कार्यकर्ता एका विशिष्ट विचारांचा व निष्ठेचा आहे म्हणून त्याला वगळा ही बाब येथे चालत नाही.

गिरण्यागिरण्यांतील कामगारांनी खात्याखात्यांतून निवडलेल्या प्रतिनिधींचा समावेश असलेली, 'एक गिरणीचे कामगार एक' या भावनेनं संघटित झालेली कमिटी हीच या कृतिसमितीची घटक होऊ शकते आणि त्यांनाच फक्त कृति-समितीवर प्रतिनिधित्व मिळते.

कोणतीही व कोणाचीही लाचलुचपत, वशिलेबाजी चालू न देता कामगारांच्या प्रश्नावर लढणे आणि प्रातिनिधिक संघटना होणे असा प्रयत्न कृतिसमितीने चालविला आहे.

कृतिसमितीने कार्यकर्त्यांचा संच उभा केला आहे आणि १८ जुलै रोजी त्यांनी गिरणी कामगार परिषद भरविली. या कार्यकर्त्यांनी २० हजार स्वागत सभासद नोंदविण्याचे काम केले.

या परिषदेचे वैशिष्ट्य म्हणजे अध्यक्ष (श्री. गायकवाड, ज्युपिटर मिल क्र. २) स्वागताध्यक्ष (श्री. गावकर, टाटा मिल) व उद्घाटक (श्री. हडकर, इं. यु. मिल

क्र. १) हे सारेच कामगार होते.

या परिषदेत सामील व्हा, म्हणून मुंबई गिरणी व्यवसायातील साऱ्या युनियन्सना कृतिसमितीने हाक दिली. संघ व गिरणी कामगार युनियन यांचा कृतिसमितीला विरोधच, कारण कृतिसमिती बलाढ्य होणे हे त्यांच्यावरील संकटच. काही कामगार संघटनांनी ही परिषद संयुक्त व्यासपीठाखाली भरविण्यात यावी अशी अट घातली. हे कृतिसमितीला मान्य नव्हते. म्हणूनच मुंबई गिरणी कामगार युनियनच्या १ सप्टेंबरच्या संपात सामील न होता त्या संपात भागीदारी करायची नाही असा निर्णय घेतला गेला.

मुंबई गिरणी कामगार युनियनला कृतिसमितीबद्दल भयंकरच राग दिसतो. त्यांचे कॉ. अर्जुन पालव मला म्हणाले की, १८ जुलैच्या परिषदेनंतर कृतिसमितीचे ऑफिस उघडलेच गेले नाही; पण हे धादांत असत्य आहे. रोज संध्याकाळी कार्यकर्ते तेथे जमतात. श्री. पालव हे कृती समितीचे अध्यक्ष होते. पण ते, कॉ. तुकाराम जगताप व श्री. एल्. वाय्. शिंदे हे समितीतून बाहेर पडले, पक्षाच्या आदेशावरून. दुसरे म्हणजे बेस्टच्या संघर्षसमितीत 'फॅसिस्ट' शिवसेनेच्या गळ्यात गळा घालणारे साम्यवादी नेते म्हणतात की, कृतिसमितीत शिवसेना, लाल निशाण गट यांचे वर्चस्व असून त्यांच्यात नेतृत्वाबाबत चढाओढ चालू आहे. कृतिसमिती, कामगारसमित्या यांची शक्ती क्षीण होत चालली आहे, असाही त्यांचा दावा. हे काही प्रमाणात खरे आहे.

३५ गिरण्यांवरून हे प्रमाण २६ गिरण्यांवर आले आहे. पण त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे, संघातून बाहेर पडून वेगळा संसार थाटलेले श्री. वसंतराव होशिंग हे संघात परत गेल्याने त्यांच्याबरोबर एक फार मोठा गट पुन्हा संघात परत गेला आहे. कृतिसमितीला संयुक्त व्यासपीठाची कल्पना मान्य नसण्याचे कारण, तसे झाले म्हणजे भागीदारी आणि पक्षप्रणित युनियनचे वर्चस्व येणार आणि याचा अर्थ हे सर्व दूर ठेवू इच्छिणाऱ्या कृतिसमितीचे विसर्जन होणार हे होते.

१ सप्टेंबरच्या संपात गिरणसमिती व कृतिसमिती यांच्याबद्दल जिव्हाळा असणारे अनेक कामगार सामील झाले ते त्यांच्या प्रश्नांकडे पाहून, बावट्याकडे पाहून नव्हे. पण खरी लढाई पुढेच आहे. दिवाळी जशी जशी जवळ येईल तसे लढाईला तोंड लागू लागेल. अर्थातच भाई डांगे हा बिलंदर माणूस हे सर्व हेरून आपली सर्व प्यादी सरकवीत आहे. कामगारलढे व डावपेच म्हणजे त्यांच्या हाताचा मळ आहे. पण शेवटी कामगार ज्यांच्यामागे, तो पक्ष बलवान हे गिरणी वर्तुळातील नेहमीचे दृश्य.

कृतिसमितीने पुढील मागण्या मांडल्या आहेत.

१. राष्ट्रीय मिल मजदूर संघाची मान्यता रद्द करा. (प्रातिनिधिक संघटना म्हणून कामगारांच्या कोणत्याही प्रश्नावर त्यांच्यावतीने बोलण्याची मक्तेदारी

संघाकडे आहे. एखादी साधी नवी जागा गिरणीत निर्माण करायची असली तरी संघाचा सल्ला घेतला जातो. संघ पूर्णपणे मालकधार्जिणा आहे. हे सारे व अशाच अनेक गोष्टी BIR या कायद्यानुसार होतात म्हणूनच या कायद्याला काळा कायदा असे म्हटले जाते, २. गिरणी कमिटयांना मान्यता द्या. ३. बंद गिरण्या ताबोडतोब सुरू करा. ४. बडतर्फ कामगारांना तावडतोब कामावर घ्या. ५. बारा टक्के किमान बोनसाचा कायदा करा. ६. सरकारनियंत्रित गिरण्यातील महागाई व इतर हक्क कपात रद्द करा.

गिरणी कामगारांची अवस्था खरोखरच भयावह आहे. एकतर जुनाट यंत्रे काढून नवी न बसविण्यामुळे गिरण्या बंद पडण्याचे संकट सारखे समोर असते तर काही ठिकाणी आधुनिकीकरणामुळे कामगारकपात होत आहे. एकटया न्यू स्टँडर्ड (चायना) गिरणीत गेल्या १५ वर्षांत कामगारांची संख्या २७०० वरून १३०० वर आली आहे. सरकारी आकडेवारीनुसार असे दिसते की गिरणी कामगारांची संख्या २॥ लाखावरून १ लाख ७५ हजारांवर आली आहे. पूर्वी जो धंदा पगार व महागाईभत्ता यात पुढे होता तो इतरांच्या मागे पडू लागला आहे. टेरिकॉटसारखे चांगले उत्पन्न देणाऱ्या कापडाचे उत्पादन होऊनही व व्यवसाय चांगला चालत असूनही १९४७ पासूनचे पगाराचे स्टँडर्ड अजूनही तेच आहे. वार्षिक पगारवाढ किती तर अवघी १ रुपया.

गिरणीची पुर्नरचना करण्यासाठी मालक रक्कम उचलतात ती कामगारांच्या नफ्यातून. हा नफा बोनसरूपाने त्यांना मिळाला पाहिजे, पण हा मलिदा मालक खातात. पूनर्रचना काहीही होतच नाही.

बदली कामगारांची अवस्था तर भयानकच आहे. ही पद्धती इतर कोणत्याही व्यवसायात नाही.

ज्यावेळी जातू (कायम) कामगार रजेवर जातो वा आजारी पडतो त्यावेळी त्याची जागा बदली कामगार घेतो. इतर कामगारांप्रमाणे त्यांना रोज कामावर यावे लागते, हजेरी लावावी लागते. नियमांचे पालन करावे लागते, अनेक जाचक बंधनातून जावे लागते आणि बदली कामगार म्हणून पास टिकवावा लागतो. पण नोकरीच्या शाश्वतीचा, पगाराचा, पगारी रजेचा, नुकसान भरपाई, ग्रॅच्युइटी प्रॉ. फंड, आजारीपणातील रजा असा कोणताही अधिकार त्यांना नाही. रोजचा रोजगार मिळो वा न मिळो पदरमोड करून त्याने गिरणीत हेलपाटे घालायचे हा न्याय. ५ पासून १२ वर्षेपर्यंत बदली कामगार म्हणून काम केलेले लोक या व्यवसायात आहेत पण नोकरीत अजून कायम नाहीत.

१९६६ साली या प्रश्नाचा अभ्यास करण्यासाठी वाझकर समितीची स्थापना होऊन अहवाल बाहेर आला, पण त्यांची अजून योग्य ती अंमलबजावणी नाही.

अशा या साऱ्याच प्रश्नांसाठी लढा देण्याची कृतिसमितीची इच्छा आहे.

मध्यंतरी कृतिसमितीत फाटाफूट झाल्याची बातमी होती. म्हणून मी वेगवेगळे प्रश्न विचारून कामगार व समितीचे सदस्य यांचा कल काय आहे त्यांची चाचपणी केली.

श्रीमती तुळसाबाई (इं. यु. मिल–१) यांच्याकडे पाहाताच मला कै. मामा वरेरकरांच्या 'सोन्याचा कळस 'मधील बिजली आठवली. या बाईचे धैर्य अचाट आहे. वेळीप्रसंगी पोलिसांच्या बंदूकीच्या दस्त्याला हाताने मागे सारणारे ते धैर्य. पूर्वी त्या गिरणीकामगार युनियनच्या कार्यकर्त्या. पण त्याच युनियनचे गिरणीतील कार्यकर्ते स्वतःचे हीत व गैरव्यवहार यात गुंतू लागले हे त्यांना रुचेना. ३० वर्षांच्या नोकरीत २० वर्षे युनियनचे धडाडीने त्यांनी कार्य केले होते. भाई गणाचार्य यांच्याही कानावर त्यांनी ते गैरप्रकार घातले. त्यांनो 'पाहातो' असे म्हटले खरे. पण कार्यकर्त्यांचे गैरव्यवहार चालूच राहिले. त्या आता कृतिसमितीचे काम पाहातात. त्याचे घर हेच समितीचे ऑफिस आहे. समितीत अनेकवेळा वादळी चर्चा होतात, पण बहुमताचे निर्णय मोकळेपणाने मान्य केले जातात असे त्यांनी सांगितले. म्हणूनच समितीची एकजूट टिकेल यावर त्यांनी विश्वास व्यक्त केला.

गेली १४ वर्षे संघाचे कार्य केलेले. श्री. रामपाल पांडे संघाला कंटाळून समितीत आले. संघ कांग्रेसप्रमाणेच 'गरीबी हटाबो मे गरीब कोही हटा रहा है, लोकशाहीने ठोकशाही चल रही है तो सोचलिया समितीमे आये' असे त्यांनी सांगितले. दुसऱ्या युनियनचे काम केल्याबद्दल त्यांना कामावरून दूर करण्यात आले आहे.

बंद पडलेल्या ज्युपिटरमिलचे कामगार व १८ जुलै परिषदेचे अध्यक्ष श्री. निवृत्ती गायकवाड – अगदी साधा माणूस, अशुद्ध बोलणारा पण दक्ष, विचारी, आणि अभ्यासूवृत्तीचा. ते म्हणाले की कामगारांच्या हाती ही शक्ती आली तर आम्ही आमचे भले करू. आतापर्यंत कोणत्याही युनियनने योग्य मार्गदर्शन केले नाही, हे आता होत आहे. आम्ही एकजूट टिकवली पाहिजे व ती टिकेल. आम्ही लोकशाही तत्व मानतो. युनियन म्हटली की पक्षस्वार्थ आला. येथे वैयक्तिक वा पक्षीयस्वार्थ नसून कामगारहिताची जपणूक आहे. कामगार समित्यांचे आणखी वैशिष्टच म्हणजे कामगार कारकून एक आहेत, कारकूनी करणारे श्री. राणे म्हणाले 'कामगारांना त्रास देण्याचे प्रमाण फॅक्टरीपेक्षा गिरण्यांत अधिक. संघाची मक्तेटिकेल अशाचरीतीने BIR अॅक्टची रचना झाली होती. कोणत्याही प्रातिनिधिक युनियनची मक्तेदारी असण्याला माझा विरोध आहे." शिवसेनेचे श्री. हडकर यांना पक्षहित व कामगारहित यात महत्त्व कशाला देता असे विचारले ते म्हणाले की अर्थातच कामगारहित.

सुमारे तीन तास त्या कार्यकर्त्यांशी चर्चा केली. सांगण्यात तळमळ जरूर आहे. एकजूटही आहे. पण स्वपक्षाचे हीत व राजकारण त्यांनी दूर ठेवले तर यश जरूर मिळेल.

□ □ □

आस्तिक–नास्तिक

देवीदास बागूल

# आधी देव की आधी माणूस ?

आधी बीज की आधी वृक्ष ? ह्या प्रश्नाचे उत्तर अजून निश्चित झालेले नाही. पण त्या प्रश्नावर वाद घालता येतो. कुणी म्हणतो की आधी बी असते. बी असल्याशिवाय झाड उगवणार कसे ? त्यावर दुसरा म्हणतो की आधी झाड असते. मग त्याला फूल, फुलापासून फळ, आणि फळातून बी मिळणार. म्हणजे बी मिळण्यासाठी आधी झाड हवे. असा वाद बराच वेळ चालतो. पुढे वाद कसा संपतो कुणास ठाऊक ?

बी आणि झाड ह्यांच्या संबंधावर वाद घालता तरी येतो. पण आधी देव की आधी माणूस यावर वाद घालायला तरी जागा आहे का ? खरं सांगायचं म्हणजे असा प्रश्न विचारणं हेच मुळी पाखंडीपणाचं जबरदस्त लक्षण आहे. असा प्रश्न विचारणारा आज कोणामुळे जिवंत आहे ? देवाने जर तुम्हाला निर्माणच केले नसते तर तुम्ही प्रश्न तरी कसा विचारला असता ? देवानेच ही सगळी सृष्टी निर्माण केली आहे. अगदी साधं उदाहरण घ्या ना ! घड्याळ चालतं असं आपण म्हणतो. पण त्याला कोणीतरी किल्ली दिल्याशिवाय ते चालेल कसं ? घड्याळाचं जसं आहे तसंच जगाचं आहे. जगाला कोणीतरी किल्ली देणारा आहे. तो आहे म्हणून जग आहे. तात्पर्य, आधी देव मग माणूस !

देवाच्याबद्दल जशी लोकांची तोंडं बंद केली गेली तशीच काही काळ राजाच्या-बद्दलसुद्धा लोकांची तोंडं बंद केली गेली होती. आधी राजा की आधी प्रजा ? या प्रश्नाचं उत्तर ठरलेलं होतं. ते उत्तर म्हणजे आधी राजा. तशा अर्थाच्या म्हणीसुद्धा तयार करवून घेतल्या होत्या. ‘ लाख मरोत पण लाखांचा पोशिंदा न मरो ’, ‘ राजा बोले दळ हाले, ’ ‘ ना विष्णुः पृथ्वीपतिः ’ अबब ! एक ना दोन. पण हळूहळू काळ पालटला. चार दिवस सासूचे, चार दिवस सुनेचे याप्रमाणे राजाचे चार दिवस संपले आणि लोकशाहीत लोकांचे दिवस आले. प्रथम लोकांची

काळजी घेतली पाहिजे, लोकांचे मत विचारात घेतले पाहिजे, त्यांच्या मताला मान दिला पाहिजे असे आचारविचार मान्य झाले, रूढ झाले.

राजाची शंभर वर्षे भरल्यावर, देवाचीही शंभर वर्षे भरायला काय हरकत आहे ? खरं सांगायचं म्हणजे राजाची शंभर वर्षे भरण्याची वाट न पाहता काहींनी देवाची उचलबांगडी करायला सुरुवात केली होती. केशवसुतांनी 'देवदानवा नरे निर्मिले. हे मत लोका कवळू द्या' असे म्हणण्यापूर्वीच ज्ञानेश्वर नावाच्या पोरसवदा कवीने 'आधी देव की आधी माणूस' याचे उत्तर बारक्या आवाजात देण्याचा प्रयत्न केला पण नंतरच्या ज्ञानेश्वरभक्तांनी ज्ञानेश्वरांचे ते बोल टाळांच्या गजरात पार बुडवून टाकले.

ज्ञानेश्वरांना नेमकं काय हवं होतं ? नेमकं काय हवं होतं हे काही सांगता येईल असं वाटत नाही. पण त्यांची किमान अपेक्षा काय होती हे सांगता येईल. त्यांना किमान एवढंच हवं होतं, की माणसांनी माणसांची गांजणूक करू नये, फसवणूक करू नये. काही विशिष्ट माणसांची सोय करण्यासाठी इतर माणसांची गैरसोय करू नये, थोड्या माणसांच्या सुखशांतीसाठी इतरांना दु:खपीडा देऊ नये. निदान निदान असे तरी करावे की देवाच्या नावावर माणसांना लुबाडू तरी नये. ते म्हणतात की,

> अहो वसती धवळारे । मोडूनि केली देव्हारे ।
> नागवूनि वेव्हारे । गवादी घातली ।। १३–२३१ ।।

अहो, राहते जुनेगच्ची वाडे मोडून त्यांची देवळे करावी, व्यवहारात गरिबांना नागवून अन्नछत्रे घालावी, हे काम करणे म्हणावे, की चेष्टा म्हणावी ? (इया करणी की चेष्टा ! काई हंसो ।। २३४ ।।) अशी कृत्ये पाहून हसावे तरी किती ?

जोपर्यंत माणसाच्या प्राथमिक गरजा म्हणजे अन्न-वस्त्र-निवारा ह्या पूर्ण होत नाहीत तोपर्यंत देवाच्या निवाऱ्यासाठी खर्च करणे ही एकप्रकारची हिंसाच आहे, असे ज्ञानेश्वरांनी म्हटले आहे.


पण प्रत्यक्षात अजूनही काय दिसते आहे ? इकडतिकडचे राहू द्या, खुद्द ज्ञानेश्वरांच्या आळंदीला तरी काय चाललेले दिसते ? आजूबाजूच्या वस्तीतून, खेड्यापाड्यातून हजारो लोकांना निवाऱ्याची नीट सोय नसतानाही, ज्ञानेश्वरांच्या मंदिराची सर्वतोपरी देखभाल करण्यात पैसा खर्च केला जातो. आजूबाजूच्या माणसांना निवाऱ्याला गळके छप्पर असताना ज्ञानेश्वरांच्या मंदिराला मात्र चुनेगची छप्पर तंदुरुस्त अवस्थेत ठेवण्याची दक्षता घेतली जाते. आणि हा सगळा खर्च कोणाच्या पैशातून ? अर्थातच इतर माणसांवर लादलेल्या करातून किंवा ज्ञानेश्वर म्हणतात त्याप्रमाणे 'नागवूनि वेव्हारे' म्हणजे गोरगरिबांची व्यवहारात फसवणूक करून. शेतमजुराला कमी मजुरी देणे, त्याला गुमास्ता कायदा न लावणे, दाम-


दुपटीने धान्य वसूल करणे, धान्याचा साठा करून ठेवून चणचणीच्या काळात तिप्पट भावाने विकून गरीबांना लुबाडणे, अन्नपदार्थात भेसळ करून गरीबांना नाडणे इत्यादी नाना उपायांनी पैसा मिळवला म्हणजे मग त्यातील थोडासा वाटा ज्ञानेश्वरांच्या मंदिराच्या खांबासाठी, फरशीसाठी वा घंटेसाठी खर्च करणे, ह्याला काय म्हणावे ?

ज्ञानेश्वर म्हणतात की आधी देव निर्माण झाला की आधी माणूस, ह्याचा निवाडा कधीतरी सावकाश करू; पण प्रथम एवढे तरी करूया की आधी देवाची गरज भागवण्याऐवजी आधी माणसाची गरज भागवू या. सगळी माणसे जेव्हा गुण्यागोविंदाने, एकत्र कुटुंबपद्धतीने परस्परांची सोयगैरसोय पाहून जगतील तेव्हा मग देवाची ख्यालीखुशाली विचारू. म्हणजे भौतिक गरजांच्या बाबती तरी 'आधी देव की आधी माणूस' असा प्रश्न उभा राहिला तर त्याचे उत्तर नक्कीच असे की 'आधी माणूस !' माणसाला डावलून, नागवून देवळे बांधणे म्हणजे सरळसरळ चेष्टा आहे, क्रूर चेष्टा आहे, असे ज्ञानेश्वरांनी भीडभाड न बाळगता म्हटले आहे.

पण दु:खाची गोष्ट अशी की ज्ञानेश्वरांचा हा माणुसकीचा संदेश इतरांनी तर सोडाच, पण त्यांच्या वारकरी भक्तांनीसुद्धा जुमानलेला नाही. हजारो लाखो हरिजनांची छळणूक करून हे वारकरी पंढरपूरच्या विठ्ठलाच्या देवळाची निगा राखण्याकरता तेथल्या पेटीत पैसे टाकत आहेत. इकडे हरिजनांची छपरे भुईसपाट झालेली असताना तिकडे पंढरपूरला विठ्ठलाच्या देवळाचा कळस आभाळात अढळ राहावा म्हणून उदार होऊन पैसा देत आहेत.

अरेरे ! ज्ञानेश्वरांनी सांगितले काय, नि त्यांचे वारकरी शिष्य करतात काय ? ज्ञानेश्वरांना एकेका माणसाची अस्तित्वविषयक जाणीव आणि काळजी होती, मग त्यासाठी देवाकडे कानाडोळा झाला तरी हरकत नाही अशी नास्तिकवादी वाटणारी भूमिका होती. माणसाचे अस्तित्व दुर्लक्षून देवाच्या अस्तित्वासाठी झटणे ही गोष्ट ज्ञानेश्वरांना क्रूर चेष्टेसारखी वाटत होती. देव आणि माणूस या दोहोंमध्ये त्यांनी माणसाला दिलेले प्राथम्य अजूनही आचरणात आणले तर त्यांनी पाहिलेले 'हे विश्वचि माझे घर' हे स्वप्न खरेखुरे व्हायला, सत्य व्हायला मुळीच विलंब लागणार नाही.






## शिक्षण–संस्था

विद्यार्थी शिकत आहेत
विद्यार्थिनी शिकत आहेत
शिक्षणसंस्था चालू आहेत.
नव्या निघत आहेत
जुन्या आहेत तिथेच आहेत
शिक्षणसंस्था चालू आहेत.
घरी शिकवण्या घेत आहेत
वर्गात 'पाट्या टाकत' आहेत
कॉमनरुम 'यस् सर'च्या लाळघोटेपणाने
भरत आहे
शिक्षणसंस्था चालू आहेत.
'मिटिंगा' वर 'मिटिंगा' होत आहेत
'I will not engage'च्या नोटीसा लागत
आहेत
'थर्ड' ने जाऊन 'फर्स्ट' घेत आहेत
शिक्षणसंस्था चालू आहेत.
'सऽऽऽर'ची नाजूक हाक येते आहे

"एकदा या "ची आमंत्रणे दिली जात आहेत
(स्वीकारली जात आहेत)
जीवनाच्या, इकडच्या तिकडच्या
अभ्यासाव्यतिरिक्त बाकी सर्व difficulties
घरी solve होत आहेत, विद्यार्थिनी शिकत
आहेत
शिक्षणसंस्था चालू आहेत.
ओझ्याची गाढवे राबत आहेत
अर्धपोटी कष्टत आहेत
प्राचार्य मात्र ॲम्बेसेडर, पैसा, मुली
या पुढती लवत आहेत वाकत आहेत
शिक्षणसंस्था चालू आहेत.
बोलू नका कुणापाशी
'पेपर सेटर' मी आहे
अशा जाहिराती लागत आहेत.
शिक्षणसंस्था चालू आहेत.
वाचनालये उभी आहेत
कपाटे पुस्तकांनी भरली आहेत
बहुतेकांची पाने घेतल्यापासून आहेत तशीच
कोरी करकरीत आहेत
शिक्षणसंस्था चालू आहेत.
N. C. C. चालू आहे A. C. C. चालू आहे
मेजर, कॅप्टन, लेफ्टनंट, सेकंड लेफ्टनंट
छात्रांना शिस्त लावत आहेत
कडक, अगदी "स्टार्चड्"
आणि इकडे वर्गात मात्र कांचा फुटत आहेत
बाके तुटत आहेत
नवीन आलेल्या भीष्माचार्यांना
कागदी बाणांवर तोल संभाळत
घंटेच्या "उत्तरायणाची" वाट पहात
तास संपवावे लागत आहेत
शिक्षणसंस्था चालू आहेत.
'बी. सी.', 'इ. बी. सी.', 'यू. जी. सी.'चा
गोंधळ चालू आहे

'ग्रॅन्ट'कडे डोळे लावून ऑफिस काम रेटत आहे
शिक्षणसंस्था चालू आहेत.
नवे येत आहेत जुने जात आहेत
सगळेच शिकवत आहेत
शिकत मात्र कोणीच नाही
म्हणून वास्तू उसासत आहे
शिक्षणसंस्था चालू आहेत.

— सौ. मालती कुर्लेकर

## जाणीव

तो निर्झर रानातला
डोहातुन घोटाळला
त्या तिथे वृक्ष वाकला
झाडीच्या आडोशाला
त्या तिथे ...

टेकाडी उंबर स्थिरे
झुळुकेतून तेव्हा झुरे
पाषाणी उरले ठसे
तेव्हाचे होते तसे
त्या तिथे ...

चुरगळल्या गवतावरी
पुरातून आली माती
दडविली तियेने स्मृति
त्या तिथे ...

त्या तिथे ... आज ना तिथे
जे होते आणि नव्हते
देखता आज जाणवते
या उरि काहीतरी जळते
या 'इथे' ... !

— प. शि. रेडकर

सौ. मालती कुर्लेकर यांची 'शिक्षणसंस्था' ही कविता आकाराने मोठी (आणि काहिशी विस्कळीत) परंतु बरीच नाविन्यपूर्ण वाटते. या कवितेला कठोर वास्तवदर्शी आशयाचा गाभा आहे; आणि मिस्किल उपरोधिक भाषेचे रूप आहे. शिक्षणाच्या नावाखाली महाविद्यालयातून घडत असलेल्या घटना कवयित्रीने परखड परंतु विनोदगर्भ टीकेच्या चिमटयाने उचलून एकापुढे एक ठेवलेल्या आहेत. पुन्हा या टीकेला आवेशाची आक्रस्ताळी गती नाही. एक तऱ्हेचा सोशीक अलिप्तपणा या टीकेला लाभलेला आहे. वस्तुस्थितीची उथळ विदारकता दाखवून आपण गमतीने हसणे हा या टीकेचा स्वभाव आहे. प्राध्यापक, विद्यार्थिनी, प्राचार्य, विद्यार्थी, शिक्षणसंस्था हे सगळेच एका अगतिक दुष्ट चक्राचे भाग बनलेले आहे. स्वार्थीपणा, शिक्षणाविषयी आत्मीयता नसते, शिक्षणापेक्षा अन्य गोष्टींना महत्त्व देणे, उथळपणा या दोषांनी सर्वांनाच ग्रासले आहे. कवयित्रीने या सर्वांच्या प्रवृत्तींचे आणि अपवृत्तींचे विनोदाने वर्णन केले आहे. एवढया शिक्षणसंस्था चालू आहेत, पण 'शिकत मात्र कोणीच नाही' हे या सगळयामागील दुःख आहे. त्यासाठी 'वास्तू' उसासत आहे.

प. शि. रेडकर यांच्या 'जाणीव' या कवितेत मनाला व्यथित करणारी एक स्मृती चित्रित केली आहे. या स्मृतीला विशिष्ट निसर्गदृश्याचे अधिष्ठान आहे. डोहातून घोटाळणाऱ्या निर्झराच्या काठी एका वाकलेल्या वृक्षाच्या आडोशाला केव्हातरी काहीतरी घडून गेलेले आहे. तेव्हाचे ठसे जणू तिथल्या पाषाणावर अजून तसेच उरलेले आहेत. निर्झराच्या पुरातून आलेल्या मातीने चुरगळलेल्या गवतावरची ती स्मृती दडवून टाकलेली आहे. पण त्या निसर्गदृश्याच्या सांगाती मनाला ती जाणवतेच आहे. जे तिथे अनुभवले, घडले, त्याची आज तिथे काहीच निशाणी नाही. पण ती स्मृती मात्र मनात जळते आहे. भिडते आहे. 'झाडीच्या आडोशाला' आणि 'चुरगळल्या गवतावरी' या उल्लेखातून पूर्वानुभूत घटना प्रणयाची असावी अशी रम्यविदग्ध सूचना कवीने दिलेली आहे. निर्झराचे डोहातून घोटाळणे, उंबराचे झुळुकेतून झुरणे वगैरे गोष्टीही त्याला पोषक अशाच आहेत. एका निसर्गचित्राच्या आधाराने एका भावअनुभवाचा कविहृदयावरील ठसा या कवितेने दाखविलेला आहे.

— रसिक

केशव मेश्राम

पुस्तके

# अस्वस्थ सूर्यास्त

कशीतरी केली तोंड मिळवणी
चूकभूल आता द्यावी घ्यावी

लक्ष्मीकांत तांबोळी एक तपाहून अधिक काळ [मराठीच्या कविताप्रेमी रसिकांना परिचित आहेत. १९५९ साली त्यांचा 'हुंकार' हा कवितासंग्रह प्रसिद्ध झाला. त्यातील कविता अनुकरण करणारी, वाट पुसत जाणारी आणि हौसेतून निर्माण झालेली अशी होती. आपल्या पहिल्याच पुस्तकाबद्दलची आपली ही प्रांजल आणि तटस्थ भूमिका स्वतः तांबोळींनीच निवेदन केली आहे.

'अस्वस्थ सूर्यास्त' हा तांबोळींचा नवा कवितासंग्रह. एकूण एकसष्ट कवितांच्या ह्या संग्रहाला आजच्या आकुलतेचा आवाज लाभला आहे. आज वयाची पंचविशी ते पस्तीशीच्या दरम्यान असलेल्या प्रत्येक संवेदनाक्षम, बुद्धिवादी तरुणाला आजूबाजूच्या प्रचंड विश्वचक्रात स्वतःच्या अतिसामान्यतेची जाणीव झाली आहे. त्याच्या पुस्तकी विचारांना, थोरांचे वय आठवून नम्र होणाऱ्या मस्तकाला, ज्यांचा उत्तम म्हणून उद्घोष केला गेला, पिढ्यापिढ्यांनी, संस्कृतीच्या वारसदार ब्रम्हमत्त प्रकाशकांनी जे जपण्याचा ह्या पिढीला मंत्र दिला होता आणि तो पाळणे हे आपले परमकर्तव्य आहे ह्या भावनेने ह्या पिढीने तो जोपासला होता, तो इतका व्यर्थ ठरला की आपल्या जन्मातच काहीतरी गफलत झाली आहे अशा विचारापर्यंत ही पिढी आली आहे. त्या पिढीचीच ही 'घरंदाज व्यथा' बऱ्याचशा घरंदाजपणाने तांबोळी यांनी व्यक्त केली आहे. मर्ढेकरांच्या शब्दांपेक्षा ह्या काळातील 'हनन' अधिक गुंतागुंतीचे आहे, संमिश्र आहे; आणि म्हणून अशी कविता वाचताना 'सरधोपट रस्ते' वाटाडे ठरणार नाहीत.

तांबोळींना हे शतकच अस्वस्थ वाटते. ही अस्वस्थता अनेकपदरी आहे. या देशातील परकी सत्तेविरुद्धचा संघर्ष संपला. लोकशाही आली. आता व्यक्ती म्हणून स्वतःचा आणि त्याबरोबर आपल्या अवतीभोवतीच्या समाजाचा आज ना उद्या कायापालट होणार, वेदनेनंतर नवा उषःकाळ अवतरणार, अशा तुताऱ्यांनी आसमंत निनादून उठले. डोळे काहीतरी घडते आहे ह्या जाणीवेने दिपले. ती परिचित चिरवांछित हाक ऐकू आल्यावर मन मोहरून निघेल, एक चिरस्मरणीय दृश्य मनात

कोरून ठेवता येईल, या अपेक्षेने तळामुळापासूनच्या तो खुर्चीत मान मोडून राबणाऱ्या कारकुनापर्यंत, घसाफोड करून शे-दिडशे विद्यार्थी काबूत ठेवू पाहणाऱ्या मास्तर अध्यापकापर्यंत, काळा डगला चढवून कोर्टात जाणाऱ्या वकिलापर्यंत, पदव्या सांभाळीत नोकरी धुंडाळणाऱ्या एंजिनिअर, मजुरापर्यंत; सगळ्याच वर्गांनी लख्ख डोळे उघडून पाहिल्यावर त्याला विचित्र दृश्य दिसले. त्याला दिसले मलूल होत जाणाऱ्या मावळत्या सूर्याचे तडफडणे; बदललेल्या टोप्या; नवी लेबले आणि तो दिङ्मूढ झाला. त्याच्या कलासक्त मनाला, निर्मितिक्षम हातांना, कैफ चढलेल्या मेंदूला, चाकोरीतल्या विचारांना सूर्य दिसलाच नाही; आणि व्यक्ती म्हणून, समाज म्हणून, आपले म्हणून जे जे त्याला पाहिजे होते त्यावर काळोख पसरला. ही भयानक चपराक होती : मेंदूचे पाणी करणारी.

म्हणूनच तांबोळींची या संग्रहातील कविता, उपहासाने आवेशपूर्ण बोलते; स्वतःशी भीतभीत पुटपुटते; गंभीरपणे आत्मचिंतन करते; निसर्गातील अपरिहार्यतेत क्षणभर दिलासा शोधू पाहते; हरवलेल्या 'वाटां'वरील खाणाखुणा चाचपण्याची जीवघेणी धडपड करते; शिकले-शिकवले गेलेले संकेत आपल्या मनाशी पडताळून पाहाते; शब्दांच्या सावलीने तरी जीवाची काहिली शमेल, म्हणून त्यांना अंगभर घेऊ पाहते. पण 'लक्ष उसासे कुजण्याशिवाय' काहीच त्याला दिसत नाही आणि 'एवढीच चूक। झाली माझी ॥' असे तो आत्मपीडनार्थ बोलतो. ह्या साऱ्यात तांबोळींची कविता आहे. कधी त्यांना हवे ते सांगण्यास मदत करणारी, तर कधी हुलकावण्या देणारी. म्हणून ही अस्वस्थता. हा सूर्यास्त. 'अस्वस्थ सूर्यास्त.'

शब्दांशी सलगी करणाऱ्या, निर्मितीची प्रक्रिया शोधू पाहणाऱ्या, आपल्या अंतर्मनातील अज्ञ त दालनात संभ्रमाने चाचपडणाऱ्या बऱ्याच कविता ह्या संग्रहात आढळतात. ताबोळींचा हा शोध मनःपूर्वक आहे. त्यातील अभिव्यक्तीची तळमळ सच्च्या रसिकाला नाकारता येणार नाही. 'शब्दांनो' या कवितेत ते म्हणतात.

> '.. हे धावणे, वेडे होणे, गाणे, शब्दांनो तुमच्यासाठी.'
> 'मी, माझी स्वप्ने, ऊन सावली शब्दांनो तुमच्यासाठी
> गिरवतो आहे अजूनही बाराखडी शब्दांनो फक्त तुमच्यासाठी.'

'एक : हाडाचा कवी' ह्या कवितेला एकाच वेळेस निवेदनाचा साधा व आत्मनिर्भर्त्सनेचा अंतस्थ, असा दुहेरी सूर त्यांनी लावला आहे.

> 'एक : हाडाचा कवी, नित्य मला भेटणारा
> मोठा झाला तरी अजून बाराखड्या लिहिणारा !'

ह्यांतील 'हाडाचा' आणि 'मला भेटणारा' या दोन शब्दांचा त्यांनी केलेला विशेष उपयोग लक्षणीय व सहज जाणवणारा आहे.

'आम्ही सर्व : उद्याचे महाकवी' या कवितेची आरंभीची ओळही ह्याच 'मूडस्'चा एक अपरिहार्य आविष्कार म्हणून पाहण्यासारखी आहे. ती अशी

'आजच्या पराभवातून संभवणारे आम्ही सर्व : उद्याचे महाकवी'
'एक कविता' ही चार ओळीची परिपूर्ण कविताही ह्याच वृत्तीतील :
ओळखीची वाट तरी जरा जपून चालणे
शब्द आपुलेच तरी जरा जपून बोलणे.

'मी : स्वत:', 'मी : कुणीतरी', माझी अन्त्ययात्रा 'आम्ही' ह्याच नावाच्या दोन कविता, ह्या सगळ्या कवितांकडे लक्षपूर्वक पाहिले तर 'मी' ह्या प्रथमपुरुषी सर्वनामापासून 'आम्ही सर्व' पर्यंत आणि मग पुढे 'उद्याचे महाकवी' 'रांगेतले रंगनाथ' 'मी : स्वत:, मी कुणीतरी' 'आम्ही पोटभरू', 'एका मोरूची कविता', 'आता रोजच होतो आहे पुनर्जन्म' अशा सगळ्या कविता कवींच्या व्यक्ती म्हणून स्वतंत्र व्यक्तित्वाची आणि समाजघटक म्हणून घटकांशांची चाललेली प्रचंड कुतरओढ; लक्ष्मीकान्त तांबोळी यांना शब्दमाध्यमातून मांडावयाची आहे असे दिसते. ह्या द्विधा अवस्थेतून अस्वस्थता आणि मग बापहो, उदाहरणार्थ, वगैरे, असे शब्द उद्भवतात. पण यातल्या 'एका मोरूची कविता', 'आम्ही' ह्या कविता लांबल्याने आपले सामर्थ्य हरवून बसल्या आहेत; आणि म्हणून त्यातली धग जाणवावी तितकी दाहक वाटत नाही.

वाटचाल करणे ह्या प्रतीकावर तांबोळींचा खूप जीव असावा. अनेक पद्धतीने अनेक कवितांत त्यांनी, आयुष्यक्रम, मृत्यु, पराभव, अपरिहार्यता, ईप्सिताचा ध्यास, अशा अनेक परिमाणांनी ते वापरले आहे.

'चुकत नाही जगणे, जन्म घेतला असतो म्हणून
पाय असतात, तेव्हा गत्यंतर नसते चालण्यावाचून'
(एक आत्मा : तीन प्रत्यय)

'रक्ताच्या माझ्या लावीत शेंदूर गेलो
मी खुळा असा की वाटच हरवून बसलो' (मी असा निघालो)

'जाऊ आता कोण्या गावी ?
वाट पायाखाली नाही.' (आज आनंद आनंद)

'जावे लागते तिकडेच नेईल जिकडे वारा
वारा तरी असा की गरगरा फिरवणारा
थेट मुळापासूनच सगळी स्वप्ने उडवणारा' (तो गाव)

'डोळ्यावरती आभाळ नाही एकही पाखरू
अर्ध्या वाटेवरी मला आल्या सावल्या पांखरू' (आल्या सावल्या पांघरू)

'सहस्त्राक्षातून लाभलेले दोन डोळे
जपतात पाऊलखुणा अशांच्या
ज्यांचा वाटचालीतच अंत झाला' (मी : कुणीतरी)

आणखीही एका कवितेत त्यांनी हे आपले आवडते प्रतीक खेळविले आहे. चार ओळींची 'सावली' ही कविता अशी–

"पायाखालची सावली
माझ्यावर कधीच रुसली नाही
तिनं फक्त एकदाच विचारलं–
'ही वाट कधी संपेल रे?'"

'अस्वस्थ सूर्यास्त', 'एक पावसाळी संध्याकाळ', 'तो गाव', 'एक सकाळ' 'चंद्रास्त', 'वारा आला', 'भर दुपार', 'एक डोळा स्वप्नावर' आणि 'दान' ह्या कविता या संग्रहातील परिपूर्ण व उत्तम कविता होत. प्रत्येक कविता स्वतंत्र व आशयसंपन्न आहे. संस्कृत साहित्यशास्त्रात ज्याला 'अल्पाक्षरत्व' व 'अर्थगर्भता' म्हणता येईल त्या कसोटीला उतरतील अशा या कविता आहेत.

रचनेच्या दृष्टीने पाहिले तर तांबोळींच्या कवितेला अष्टाक्षरी व अभंग अधिक प्रिय असावा असे दिसते. अंत्य यमकाचे बंधन, त्यांनी मुक्त शैलीतही पाळलेले दिसते.

श्री. लक्ष्मीकांत तांबोळी यांच्या कवितातील अनुभवविश्व संमिश्र पण संपन्न आहे. विविध अनुभवांना आपल्या स्वतःच्या पद्धतीने तांबोळी शब्दबद्ध करतात. आवश्यकता वाटलीच तर, ते अश्वत्थ, कुरुक्षेत्र, मुहंमद, कलंकी, भीष्म, मुका चंद्र, सहस्राक्ष, सहस्रशीर्ष, परशुराम, शंकर, रामचंद्र, कृष्ण, बुद्ध अशा पौराणिक संदर्भांनाही उपयोगात आणतात. 'मी पुत्र कलंकीचा' ही एकच कविता या दृष्टीने बघता येईल. अर्थात या कवितेत काव्यात्मकतेपेक्षा वैचारिकता अधिक असल्याने हे दोन प्रवाह सरमिसळ झाले नाहीत व एक चांगली कविता लटकी पडली.

कवीच्या परंपरागत विनयाला स्मरून या तरुण अस्वस्थ कवीने जरी आपल्या प्रास्ताविकाच्या अखेरीला–

'कशीतरी केली तोंड मिळवणी
चूकभूल आता द्यावी घ्यावी.'

असे उद्गार काढले असले तरी तांबोळींच्या कवितेचा ताळा बराच बरोबर जमला आहे. फक्त सरधोपट वाटाड्यांना डावलून हे 'गणित' मनापासून तपासण्याचे खऱ्या रसिकतेने ठरवले पाहिजे. □

अस्वस्थ सूर्यास्त : लक्ष्मीकांत तांबोळी : अभिनव प्रकाशन, मुंबई : किंमत ३ रुपये.


कपडे धुण्यासाठी
डिटर्जंट शक्तिशाली वडी
कपडे कितीहि चोळले तरी स्वच्छ निघतच नाहीत मुळी. मला वाटतं, या पाण्यामुळें होत असावं असं.
अग, पण मी याच पाण्याने धुते ना कपडे ? मग माझे कपडे कसे स्वच्छ निघतात? हां, पण मी साबण मात्र वापरीत नाही.
असं ? मग वापरतेस तरी काय तू ?
आता मिळू लागलेली डेट डिटर्जंट वडी.
काय असतं तीत एवढं ?
तिच्यात असते डिटर्जंट शक्ति. तिनं फेस तर चांगला येतोच पण शिवाय साबणापेक्षा ती कितीतरी प्रभावी असते. तिनं कपडे स्वच्छ नि उजळ निघतात. नीळ किंवा इतर तसलं काही वापरण्याची आवश्यकता नसते.
अगदी खरं ! डेट डिटर्जंट वडीने साबणापेक्षा दीडपट कपडे धुतले जातात. त्यामुळे तिचा वापर करणं खूप काटकसरीचं होतं !
NEW! def
डेट डिटर्जंट वडी
५०% कपडे अधिक धुणारी
अन् तेही साबणापेक्षा अधिक शुभ्र.
पाणी कसेहि असो—अगदीं क्षारयुक्त असलें तरी !
स्वस्तिक ऑईल मिल्स, मुंबई



# बर्मा फ्रंट

लेखांक : सात

कर्नल आ. भा. जाधव

# रंगूनकडे कूच



मंडाले हस्तगत करण्याच्या कामात जेव्हा आमची नंबर १९ डिव्हिजन गुंतली होती, त्याच कालात नंबर चार कोअरच्या नं. ७ डिव्हिजनने पॉककडून सरळ पूर्वेकडे मुसंडी मारून मध्य बर्मातील प्रसिद्ध कॉम्युनिकेशन सेंटर (रेल आणि रोड जंक्शन) माईकटीला हे दुष्मनन शर्थीनं लढवलेलं महत्वाचं ठाणं अहोरात्र तीन दिवस झुंज देऊन चार मार्च रोजी हस्तगत केलं. यामुळे शत्रू मंडाले आणि माईकटिलाच्या कात्रीत सापडला. या दोन्ही डिव्हिजन्समधून नंबर २० डिव्हिजन उत्तरेकडून खाली उतरत होती. तिने मंडाले आणि माईकटिलाचे दरम्यान क्यॉकसे, कूमे, वुंडवीन वगैरे ठाण्यांवर हल्ले चढवले.

आता जपानी सेनेची मध्य बर्मात सगळीकडून नाकेबंदी होऊ लागली. छोट्या मोठ्या टोळ्यांचे लचके तोडले जाऊ लागले. तरी या आघाडीवरचा जपानी सेनेचा चिवट मुख्य नेता जनरल किमुरा हार मानायला तयार नव्हता. त्याच्या सेनेतील सच्चे आणि देशप्रेमाने भारलेले सैनिक शर्थीने लढत लढत माघार घेत होते. हात वर करून पांढरे निशाण दाखवत नव्हते.

ज्यांनी इंफालला वेढा घालून आमच्या नाकात दम आणला त्या नं. १५, नं. ३१ आणि नं. ३३ या डिव्हिजन्सचा दम निघून चालला. त्यांच्या मोठमोठ्या तोफा, रणगाडे, लॉऱ्या, युद्धसामग्री वगैरेंची बरीच नासधूस होऊन जवानांची संख्याही घटत चालली होती. शस्त्रे, दारूगोळा, अन्नधान्य व इतर सामग्रीचा पुरवठा अनियमित होऊ लागला. इंडियन नॅशनल आर्मीच्या सेनेलाही युद्धसाहित्य आणि खाद्यसामुग्रीचा पुरवठा योग्य प्रकारे होत नव्हता.

मार्च महिन्याचा चौथा आठवडा सुरू झाला. १५ मेच्या सुमाराला बर्मामध्ये पावसाळा सुरू होतो. त्यापूर्वी रंगून हस्तगत होणं अत्यंत जरूर होतं. आमची फौज जर रंगूनला यापूर्वी पोचली नाही तर धुवांधार पावसाने दुथडी भरून वहाणाऱ्या अनेक नद्या, नाले, यामुळे जागजागी रस्ते, पूल तुटण्याची शक्यता असून सेना मंडाले आणि रंगूनच्या दरम्यान अडकण्याचा धोका आहे. या अफाट सेनेला सतत पुरवठा करणं आणि ती पोसणं महात्रासाचं होईल. याचा फायदा शत्रू जरूर उठवेल.

या साऱ्या परिस्थितीचा जनरल किमुराने आढावा घेतला आणि आपल्या फौजा मध्यबर्मातून हलवून दक्षिण बर्मात पेरायला सुरुवात केली.

आमच्या बर्मा फ्रंटवरील सेनेचे मुख्य जनरल स्लिम यांनीही साऱ्या परिस्थितीचा अदमास घेतला आणि मंडालेच्या फोर्ट डफरीन फोर्टमध्ये जमलेल्या डिव्हिजन कमांडर्स आणि सेनेला सांगीतलं,

'आपल्याला आजपासून दोन बलाढ्य शत्रूंबरोबर सामना द्यायचा आहे. – पहिला शत्रू म्हणजे चिवट जपानी सेना आणि दुसरा शत्रू निसर्ग. तुम्हाला रंगूनला अक्षरशः घोडदौडीनं जायला हवं. बर्मामध्ये पाऊस साधारण १५ मेच्या सुमारास सुरू होतो. दिनांक १ मेला रंगून आपल्या हातात आलं पाहिजे. माईकटिलपासून रंगून ३२० मैल आहे. आणि आजपासून आपल्याजवळ ४० दिवस आहेत. या अवधीत वाटेत येणाऱ्या शत्रूशी लढून त्यानं आणलेले अडथळे बाजूला सारून दौड मारायची आहे. याचा अर्थ रोजी निदान आठ ते दहा मैलाचं अंतर काटायला हवं. मला माहीत आहे की तुमची टँक्स, कॅरियर्स, लॉऱ्या, तोफा वाहून नेणाऱ्या गाड्या, सर्व वापरून वापरून जुन्या झाल्या आहेत. मोडकळीला आल्या आहेत. पण नवीन सामान मिळणार नाही. यांनाच वरचेवर दुरुस्त करून तुम्हाला रंगूनपर्यंत ही वहानं न्यायची आहेत. मग तिथं गेल्यावर खुशाल समुद्रात फेकून द्या. दि रेस टू रंगून मस्ट बी वन अँट एनी कॉस्ट.'

आमच्या फौजेची उत्तरेकडून खाली दक्षिणेकडे चाल अशी होती–

(अ) नंबर ७ डिव्हिजन – पोकोक्कूकडून प्रोमकडे, आराकान योमा पर्वत रांगांच्या पूर्वेकडून.


(ब) नंबर २० डिव्हिन – मंडालेपासून प्रोमकडे इरावती खोऱ्याच्या मार्गे. (या डिव्हिजनमध्ये सी टँकस्क्वाड्रन आणि आमची कंपनी होती)

(क) नंबर ५, १७ आणि १९ डिव्हिजन – पेग्-योमा पर्वतरांगांच्या मार्गे रंगूनकडे.

## २५ मार्च ४५

इंफालच्या वेढ्याचे कडे तोडून पर्वतमय भागातून लढत लढत पलेल, टाम, कलेवा मार्गे जवळ जवळ एक वर्षाने आम्ही मंडालेला पोचलो. या कालात शत्रूबरोबर सामना करत असतानाच रौद्र स्वरूप धारण करणाऱ्या निसर्गाशीही टक्कर द्यावी लागली. विशेषतः तोफखाने, टँक्स आणि लॉऱ्या यांच्यावर फार ताण पडला. कुमक पोचण्याचा मार्ग (लाईन ऑफ कम्युनिकेशन) बराच ताणला होता. त्यामुळे

# रंगूनवर चाल




दारूगोळा, खाद्यपदार्थ आणि पेट्रोल, तेले वगैरे अत्यंत काटकसरीने वापरावी लागत होती. आणि हीच स्थिती रंगूनला पोचेपर्यंत कायम राहाणार होती.

रॉयल आर्मर्ड कोअर टँक रेजिमेंटचा 'सी' स्क्वाड्रन आणि ग्रिनेडियर्सची आमची 'ए' कंपनी आता नंबर २० डिव्हिजनला जोडली होती आणि मंडाले–मागवे–प्रोम मार्गे इरावतीच्या खोऱ्यातून रंगूनकडे कूच करणार होती.

डिव्हिजन कमांडर मेजर जनरल रीस आज आमची तपासणी करायला आले होते. मेजर न्यूमनला ते म्हणाले–

'नाऊ वुई आर आउट ऑफ मौंटनस कंट्री अँड ऑपरेटिंग ऑन प्लेन्स. 'स्पीड' इज दि ऑर्डर ऑफ दि डे. आय नो द कंडीशन ऑफ युवर टँक्स बट यू मस्ट कीप देम ऑन द रोड ऑल द टाईम्स विथ अँव्हेलेबल रिसोर्सेस.'

आमच्या कंपनीत येऊन त्यांनी जवानांशी बातचीत केली. ते म्हणाले–'जवान कुछ तकलीफ?'

त्यावर आमचे उमदे, ताठ कण्याचे जाट जवान हसून म्हणाले, 'कुछ तकलीफ नही साब. सब अच्छा है. आप सिर्फ हमे अँडवांसकी ऑर्डर दो.'

आमच्याजवळच एक ट्वेन्टी फाईव्ह पाऊंडर तोफेचा खड्डा होता. त्यात तोफेजवळ एक जवान उभा होता. जनरल खड्डयात उतरले आणि जवानाच्या पाठीवर हात ठेवून म्हणाले,

'जवान, तुम्हारा नाम क्या है?'

'गनर काशीनाथ सुर्वे, साब' जवान अँटेंशन पोझीशन घेऊन झोकात बोलला.

यावर जनरल म्हणाले–'खाशीनाट हमको बौट अफसोस है के टुम को खानेको पूरा रॅशन नही मिलटा.'

यावर तो मर्द मराठा झटकन बोलला, 'साब, हमको राशनकी फिकीर नही है. उस्सेभी कम मिलेगा तो भी चलेगा. लेंकीन ये तोफके गोले हमकोइ पूरे देदो. उसका राशन कम नही करना. आपको एकदम रंगून पोंचा देंगे.'

यावर जनरलसह सारे दिलखुलास हसले.

माझ्या अंगावर मुठभर मांस चढलं. मी त्याला म्हटलं, 'काशीनाथ कुठला राहाणारा तू?'

मराठी शब्द कानावर पडताच काशीनाथ चमकला आणि गालाच्या या कोपऱ्यापासून त्या कोपऱ्यापर्यंत हसून म्हणाला–

'चिपलूनचा, साएब. आनि तुमीऽऽ'

'मी कोल्हापुरचा. चिपळूणच्या आप्पासाहेब विचाऱ्यांना ओळखतोस काय तू?' मी हसत विचारले.

'हो. वलाकतो ना. आमचं पावनचं हायत ते.' काशीनाथ खुषीत येऊन बोलला.

'अरे वा. मग तूही आमचा पावना. आप्पासाहेबांचा मी भाचा.' मी म्हणालो.

काशीनाथला खूप आनंद झाला.

रात्री त्यानं माझ्यासाठी मुद्दाम माशाचं कालवण करून आणलं. ते कोकणी पद्धतीचं तिखट कालवण मी आणि डनलॉपनं डोळयात पाणी येईपर्यंत खाल्लं.

## २८ ते ३१ मार्च ४५

'सी स्क्वाड्रन आणि आमची कंपनी वर्यॉकसेला २८ मार्चला पोचली. काननची कंपनी आमच्यापासून जवळच आहे. तो भेटला. स्टेलाने आणि त्याने येत्या आक्टो-

बरमध्ये लग्न करायचे ठरवले आहे. वडलांनी याचे नाव टाकले. डीन आता कोमिल्लाहून इंफालला आला.

## १ ते ३ एप्रिल ४५

एक तारखेला आम्ही वुंडवीनला पोंचलो. जवळपास दुष्मन नाही. आराम चाललाय. टँक्स, गन कॅरियर्स आणि लॉऱ्यांचा मेंन्टेनस जेव्हा वेळ मिळेल तेव्हा चालूच असतो.

## ४ ते ६ एप्रिल ४५

आम्ही यींडाला आलो. आमचे पेट्रोलिंग चालू आहे . आसपास दुष्मन नजर येत नाही.

युरोपमध्ये लढाई शेवटच्या टप्प्यावर आलेली दिसते. दोस्त सैन्य बर्लिनकडे घोडदौडीने कूच करीत आहे.

## ७ ते १० एप्रिल ४५

सध्या आम्ही टॉंगड्वींगीत आहोत. इरावतीच्या काठावर वसलेलं हे टुमदार गाव सुंदर दिसतं. या गावात मोठा पगोडा असून त्यावर अप्रतिम नक्षीकाम केले आहे. लाकडाची आणि बांबूची छोटीछोटी सुबक घरे हिरव्यागार शेतांच्या आणि झाडांच्या पार्श्वभूमीवर उठून दिसतात.

हा प्रदेश सुपीक असल्यामुळे स्त्रीपुरुष चैनी आहेत व झोकात राहातात. स्त्रिय रंगीबेरंगी पोषाख करून. बाजारहाट, दुकानदारी वगैरे कामे हुषारीने करतात. त्या खूप कष्टाळू आहेत. पुरुषवर्ग त्यामानाने थोडा सुस्त आणि आळशी आहे. एकंदरीत लोक हसतमुख आणि आतिथ्यशील आहेत. नाच, गाणी, कलाकुसर वगैरेंची आवड आहे.

## ११ ते २७ एप्रिल ४५

टॉंगड्वींगीच्या पश्चिमेला मागवे हे शत्रूचे महत्वाचे ठाणे असून ते हस्तगत करणे अगत्याचे होते. म्हणून या ठाण्यावर पूर्वेकडून टँकस्क्वाड्रन, आमची कंपनी

आणि पायदळ पलटणीच्या दोन कंपन्यांनी चाल केली. तसेच आमच्या पश्चिमेला नं. ७ डिव्हिजन उत्तरेकडून दक्षिणेकडे कूच करत होती. त्या डिव्हिजनबरोबर काम करत असलेला टँकस्क्वॉड्रन आणि ग्रिनेडियर्सची 'बी' कंपनी यांनीही याच वेळेला माग्वेवर उत्तरेकडून चाल केली. जपानी सेना येथून आधीच निघून गेली पण आय. एन. ॲ. ची एक बटालियन घेऱ्यात सापडली. तिचे कमांडिंग ऑफिसर मेजर मानलिंग आणि आठशे जवान आमच्या स्वाधीन झाले. या सर्व जवानांना नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्याविषयी अत्यंत आदर वाटत असून त्यांच्या व्यक्तिमत्वाने ते सारे भारावून गेले होते. पण जपान्यांनी या सेनेला योग्य मदत व वागणूक दिली नाही असे यांचे म्हणणे होते.

मागवे हे मोठं शहर असून व्यापाराचे केंद्र आहे, शत्रूच्या टोळ्या अधूनमधून हल्ले करण्याचा संभव असल्यामुळे येथे पक्का डिफेन्स लावला. मागवेला आम्ही जवळजवळ दोन आठवडे होतो.

## २८ एप्रिल ४५

आज आलान मियोला आलो. आता आमचे प्रोम या-बर्मातील आणखी एक प्रसिद्ध शहराकडे डोळे लागले आहेत.

इटालियन लोक मुसोलिनीवर चिडले आणि मिलानला राजवाड्यातून त्याला भर रस्त्यात ओढून हालहाल करून मारून त्याला कुत्र्यासारखे फरकटत ओढत नेले अशी बातमी वाचली.

इटालियनांनी दोस्त सैन्यापुढे संपूर्ण शरणागती दिली. युरोपात जर्मनी आता एकाकी लढत आहे.

दोस्तांची विमानं जर्मन शहरे बेचिराख करत आहेत. युरोपची लढाई आता संपण्याच्या मार्गावर आहे अशा बातम्या येतात. आमच्याकडे जपान अजून टक्कर देतोच आहे.

## २९ एप्रिल ते २ मे ४५

पेगू योमा पर्वतरांगांच्या पूर्वेकडून नंबर ५ आणि १७ डिव्हिजन्स घोडदौडीने उतरत आहेत. आज नं. १७ डिव्हिजनची आघाडीची पथके पेगू या रंगूनपासून सुमरे ४० मैल उत्तरेला असलेल्या गावांजवळ पोचली. हे गाव पेगू नदीच्या किनाऱ्यावर वसले असून जपान्यांनी या ठिकाणी जोरदार डिफेंस घेतला होता. नदीवरचा रेल्वेचा आणि रस्त्यावरचा असे दोन्ही पूल त्यांनी उडवले होते. ठिकठिकाणी अँटी

टँक माईन्स पेरल्या होत्या. मशीनगन्स तोफखाना वगैरे हल्ला करणाऱ्या फौजेवर जोराचा मारा करत होते. तीन दिवस घनघोर लढाई चालली व शेवटी १ मे रोजी पेगू दोस्तसेनेच्या हाती लागले.

पेगू दुपारी हातात पडले आणि पुढे अँडवांस जारी करायच्या सुमारालाच मोठा सोसाटयाचा वारा सुटला, वादळ झालं आणि धुवांधार पाऊस पडायला सुरुवात झाली. पावसाळा पंधरा दिवस आधीच येऊन टपकला. रात्रभर पाऊस पडला, सगळीकडे पाणीच पाणी झालं. पेगू नदी हां हां म्हणता फुगली. सारे नाले, छोटया नद्यांना पूर आले. जागजागी रस्ते तुटले. जवानांना अर्ध्या राशनवर ठेवले.

फोर्टीन्थ आर्मीचा खुष्कीच्या मार्गाने उत्तरेकडून दक्षिणेकडे रंगून घेण्यासाठी अँडवांस चालू असतानाच समुद्राच्यामार्गे दक्षिणेकडून रंगूनवर हल्ला करण्याची योजना आखली गेली होती.

हल्ला करणारी सेना अकयाब आणि रामरी बेटांवरून वेगवेगळया सहा हिश्श्यांत बोटीने निघाली. या काफल्याच्या संरक्षणासाठी चार नेव्हल कॅरियर्स, बारा बॉबर स्क्वाड्रन्स आणि एक ग्रूप फायटर डोळयात तेल घालून वावरत होते.

याशिवाय जास्त कमी गडबड होऊ नये म्हणून नेव्हीने दोन मोठी बॅटलशिप्स,


**मुसाफिर**

- एस. टी., रेल्वे, एअर लाइन्स तिकिटांची रिझर्वेशन्स मिळवून देऊ.
- सिनेमागृहे व नाटयगृहे ह्यांची तिकिटे मिळवून देऊ.
- धार्मिक-क्षेत्रे व प्रेक्षणीय पर्यटनस्थळे ह्यांच्या प्रासंगिक सहली आयोजित करतो.
- शाळा-कॉलेज, महिला मंडळे, क्लब्स यासाठी संपूर्ण सहली आयोजित केल्या जातील.
- महाबळेश्वर-माथेरान येथील हॉटेल बुकिंग, तसेच स्वतंत्र बंगले वा खोल्या भाडयाने मिळविण्यासाठी व्यवस्था केली जाते.
- मुंबईत अथवा परगावी जाण्यासाठी आलिशान ॲम्बेसेडर गाडया भाडयाने देऊ.
- आर. टी. ओ टॅक्स, टेलिफोन व इलेक्ट्रिक बिले भरणे व तत्संबंधी कामे केली जातात.

वरील उपलब्ध सेवांसाठी अथवा अधिक माहितीसाठी संपर्क साधा—

**मुसाफिर**

गणेश निवास, गणेश पेठ लेन, खांडके बिल्डींग नं. ९ समोर प्लाझा सिनेमानजिक, दादर, मुंबई २८.
टेलिफोन नंबर ४५८४६७

कार्यालयाची वेळ—सायंकाळी ५ ते ८ फक्त.

दोन अेस्कॉर्ट कॅरियर्स, तीन क्रुझर्स आणि सहा डिस्ट्रॉयर्स असा काफला सिलोनच्या त्रिकोमाली बंदरांतून ३० एप्रिलला ब्रह्मदेशाच्या रोखाने सोडला होता. आमच्या समुद्रमार्गे हल्ला करणाऱ्या सेनेला जपानी नेव्हीकडून उपसर्ग पोचू नये म्हणून ही तयारी होती.

रंगूनवरच्या हल्ल्याची तारीख २ मे मुक्रर झाली. १ मेला रंगून नदीच्या दोन्ही किनाऱ्यावर आणि जेथे जेथे दुष्मनने डिफेंस घेतला होता त्या भागावर शेलिंग केले. त्याच दिवशी काही तासानंतर नंबर ५० व्या इंडियन पॅराशूट ब्रिग्रेडने एक गुरखा छत्रीधारी बटालियन एलिफंट पॉइंटवर फेकली.

दिनांक २ मे रोजी पहाटे नंबर २६ डिव्हिजनची एक पायदळ ब्रिगेड रंगून नदीच्या दोन्ही किनाऱ्यावर उतरली. याच वेळेला मुसळधार पाऊस सुरू झाला. जपानी यापूर्वीच जागा सोडून निघून गेले. २ मेला रंगून आमच्या सेनेच्या ताब्यात आलं.

याच वेळेला दि. २ मे रोजी नंबर वीस डिव्हिजनची आघाडीची फौज प्रोमला पोचली. तेथेही शत्रू नव्हता.

इरावतीच्या किनाऱ्यालगट गर्द छाया देणाऱ्या विशाल वृक्षांच्या छायेत आम्ही डेरा ठोकला.

## ३ मे ते ३० जून ४५

रंगून म्हणजे लढाईचा शेवट असा बर्मी भाषेत त्याचा अर्थ आहे असं म्हणतात. काहीही असो, रंगून हस्तगत झाल्यावर निदान या महायुद्धातील आमचा भाग तरी संपलेला होता.

बर्मातील बहुतेक दुष्मन सितांग नदी पार करून मलायाकडे जात होता. आता आमची सेना मलाया आणि सिंगापूर घेण्याच्या इराद्याने पूर्वेकडे वळली. या युद्धासाठी ताज्या दमाच्या नव्या डिव्हिजन्सची नियुक्ती झाली.

प्रोमला आमच्या बटालियनच्या चारही कंपन्या एकत्र आल्या. जवळजवळ पावणेदोन वर्षांनी सर्व बटालियन एके ठिकाणी आली. यानिमित्ताने पलटणीत मोठा कॅम्पफायर करून जवानांना बडा खाना दिला. सर्व ऑफिसर्स, व्ही. सी. ओज आणि जवान एकत्र बसले, गायले, प्याले, जेवले. मोठा मजा आला.

हरीकेशचंद्र आता मेजर झाला व त्याने एका रायफल कंपनीची कमांड घेतली. माझी कॅप्टनच्या हुद्यावर बढती झाली व मार्टर प्लटून कमांडर झालो.

मेजर कॉटमन भेटला. दिवसभर एका प्रशस्त झाडाखाली ग्राऊंडशीट अंथरून पुस्तकांची चवड आणि अर्धा डझन सिगरेटची पाकिटे घेऊन तो आपल्याच धुंदीत

वाचत पडलेला असतो.

डिसिल्व्हा फावल्या वेळात सुतारकाम करायला शिकतोय. छोटे छोटे टेबललॅंप स्टूल्स वगैरे बनवायला लागलाय.

ज्यूनियर अलॉप सकाळपासून बंदूक आणि शंभर दोनशे काडतुसे घेऊन मेसमध्ये रोज दहा बारा तीतर नाहीतर जंगली मुरगे, ससे वगैर मारून आणतो.

चार लहान खोके आणि एक मोठा खोका घेऊन कर्नल रॉबर्ट मेजर फिंगहॉर्न मेजर ग्रीफ आणि मेजर हॉचकीस फावल्या वेळात ब्रिज खेळत बसतात.

प्रेम, सॅंडगन, बील स्टील आणि मी क्राऊन अॅंड अॅंकर खेळत बसतो. प्रेम सतत हरतो आणि त्याच्या तोंडाचा पट्टा चालू असतो.

हरकेश बटालियन व्हॉलीबॉल टीमला प्रॅक्टिस देतो. कानन स्टेलाचे फोटो पहाण्यात आणि तिच्या पत्रांची पारायणे करण्यात मश्गुल आहे. प्रोमचे दोन महिने अशा शांत वातावरणात गुजरले.

हिटलरनं बर्लिनमध्ये सिमेंट कॉंक्रीटच्या तळघरात आत्महत्या केल्याची बातमी ऐकली.

२ जूनला युरोपातील लढाई संपली. जर्मनीच्यावतीनं अॅडमिरल डोनेटझने दोस्त सैन्याला संपूर्ण बिनशर्त शरणागती लिहून दिली.

जपान अजूनही एकांड्या शिलेदारासारखा झुंज देतोय.

---

## १ जुलै ४५

---

आज आमची पलटण रंगूनला आली. रंगून हे बर्माचे सर्वांत मोठे आणि सुंदर शहर. येथील पगोडे एकापेक्षा एक देखणे आणि नीटस आहेत. बंदरही छान आहे. आमच्या पलटणला येथे राहायला इंपीरियल बॅंक ऑफ इंडियाची प्रशस्त बिल्डिंग मिळाली आहे. आज रात्री ऐस-पैस हात-पाय पसरून स्प्रिंगच्या पलंगावर झोपताना औरच मजा वाटली.

येथे आमचा मुक्काम ५ ता. पर्यंत आहे. त्यानंतर मायदेशाकडे कूच.

---

## २ जुलै ४५

---

१९४० साली माझ्या ज्येष्ठ भगिनी डॉक्टर ताराबेनकडे राजकोटला गेलो होतो. तेथे श्री. कालीदास या बर्मात इलेक्ट्रिक गुडसचा व्यापार करणाऱ्या व्यापाऱ्याशी ओळख झाली. त्यांच्याकडे एव्हररेडी बॅटरीची एजन्सी होती. रंगूनला

त्यांची मोठी हवेली असून धंदा मोठ्या प्रमाणात चालला होता. श्री. कालीदास महिनाभर राजकोटला राहून रंगूनला परत गेले. त्यानंतर लढाई सुरू झाली आणि त्यांचा भारतातल्या कुटुंबियांशी संबंध तुटला. मी या आघाडीवर येताना मला कालीदासचा पत्ता ताराबेननी पाठवला होता व रंगूनला पोचताच त्यांची खबर-बात काढायला सांगितली होती.

आज मी त्यांना भेटायला गेलो. एखाद्या मोठ्या प्रासादासारखा त्यांचा बंगला भव्य आणि प्रशस्त होता. हवाई हल्ल्यात व तोफखान्यांच्या गोळ्यांच्या वर्षावात किरकोळ मोडतोडीशिवाय काही नुकसान झाले नव्हते.

मला पाहून कालीदासना फार आनंद झाला. त्यांनी मला कडकडून मिठी मारली आणि ते रडायलाच लागले. मन शांत झाल्यावर त्यांनी सर्वांची खुशाली विचारली. त्या दिवशी मला त्यांनी आग्रहाने ठेवून घेतले.

नेताजी सुभाषचंद्र बोस रंगूनला आले की या बंगल्यात वास्तव्य करीत. दुसऱ्या मजल्यावरील मर्तबानच्या सामुद्रधुनीकडे तोंड असलेल्या दक्षिणेकडील खोलीत ते रहात असत. तिच्यापुढे असलेल्या गच्चीत रात्री तासन् तास बसून भारत स्वतंत्र करण्याच्या योजना आखत, स्वप्नं पाहत. त्या खोलीत त्यांचे लष्करी गणवेषांतील एक सुंदर तैलचित्र होते. त्या खोलीतील पलंग, टेबले, खुर्च्या वगैरे सारे फर्निचर काळ्या शिसवीच्या लाकडाचे बनवले असून अत्यंत सुबक होते. कालीदासनी मला राहायला ही खोली दिली. जो कमरा नेताजींनी आपल्या अस्तित्वाने पावन केला त्या पवित्र खोलीत मी दिनांक दोन आणि तीनची रात्र काढली. नेताजी झोपत असत त्या पलंगावर मला झोपवेना. कालीदास माझा निरोप घेऊन गेल्यावर त्या पलंगाला मी वंदन केले आणि जमिनीवर पथारी अंथरली. त्या खोलीतील अल-मारीत नेताजींचं एक बनियान (गंजीफ्रॉक) राहिला होता. तो मी घेऊन मस्त-काला लावला नि माझ्या हॅवरसॅकमध्ये ठेवला. कालीदासनी रात्री दोन वाजेपर्यंत नेताजींच्या आठवणी सांगितल्या. त्या ऐकतांना भान हरपून गेले.

## ३ आणि ४ जुलै ४५

दिनांक ५ जुलैला सकाळी ११ वा. आम्ही रंगूनचा किनारा सोडणार म्हणून सामानाची बांधाबांध आवराआवर वगैरे चालू आहे.

इंफालचे ब्रिगेड हेडक्वार्टर्सही रंगूनला आले. ब्रिगेडियर त्यांचा ऑर्डर्ली समशेर बहादूर थापा आणि बदमाश दिवाण बहादूर, सारे भेटले. डी. बो. आता चांगलाच भरलाय अंगानं आणि मग्रूरही झालाय.

ज्यूनियर डनलॉप आणि मी तेथील मिलिटरी हॉस्पिटलमध्ये आमच्या कंपनी-

तील जखमी पेशंटना पाह्यला गेलो. तेथे आम्हाला पेगी कॅंपबेल अचानक भेटली. आम्हाला पाहून तिला खूप आनंद झाला. कितीतरी वेळ ती शेक हॅंड करत राहिली. आनंदाची गोष्ट म्हणजे वॉटरलोरींग विंग कमांडर झाला असून तो भारतात कोहाटला आहे. पेगी पुढच्या आठवड्यात भारतात जाणार असून लवकरच ते विवाहबद्ध होणार आहेत.

पेगीनं डनलॉपला विचारलं,

'ज्युनियर हाऊ इज लॉरा ? एनी प्रोग्रेस ऑन हर फ्रंट.'

डनलॉप हसला नि म्हणाला–

'येस पेगी. यू विल हिअर दि गुडन्यूज सून.'

युरोपातली लढाई संपून महिना होऊन गेला पण जपान शस्त्र खाली ठेवायला तयार नाही. ही इज फायटिंग विथ हिज बॅक टू दि वॉल.

# मातृभूमिकडे

५ जुलै ४५]



सकाळी सात वाजता फील्ड सर्व्हिस मार्चिंग ऑर्डरमध्ये तयार होऊन आम्ही इंपीरियल बॅंकेच्या बाहेरील मोठ्या डांबरी रस्त्यावर 'फॉल-ईन' झालो.

आमचे कमांडिंग ऑफिसर कर्नल रॉबर्टना प्रमोशन मिळून ते ब्रिगेडियर झाले म्हणून पलटणला भेटायला आले होते. त्यांचे जागी आमच्या पलटणचे नवीन सेकंड इन कमांड मेजर शबीयर कमांडिंग ऑफिसर झाले व त्यांना लेफ्टनंट कर्नल हा हुद्दा बहाल करण्यात आला.

याच परेडसमोर ब्रिगेडियर रॉबर्टनी या लढाईत बहादुरी गाजवून उत्तम कामगिरी केल्याबद्दल

मेजर कॉटमनना–मिलिटरी क्रॉस

मेजर हृरीकेश चंद्रला–मेन्शन–इन–डिसपॅचिस

व मलाही–मेन्शन–इन–डिसपॅचिसची पदके मिळाल्याचे जाहीर केले.

ठीक आठ वाजता रंगून बंदरावर जाण्याचा ब्यूगल वाजला आणि सफक्स बटालियनच्या बँडच्या तालावर मार्चिंग करत पलटण निघाली.

अकरा वाजता आम्ही बोटीवर चढलो. १९४३ सालच्या मध्याच्या सुमाराला आमची पलटण या आघाडीवर आली होती. दोन वर्षे दुष्मनशी झुंज देऊन आज ती मायदेशी परत निघाली आहे.

बर्माचा किनारा सोडतांना आम्हा सर्वांच्या मनात आनंद आणि दुःख यांच्या संमिश्र भावना उचंबळून येत आहेत. आनंद अर्थातच आम्ही मातृभूमीकडे चाललो आहोत, आपल्या आई-वडील, बायका मुलांना, भेटणार आहोत म्हणून आणि दुःख वाटतं ते आमच्याबरोबर खांद्याला खांदा लावून लढणाऱ्या ज्या शूर जवानांनी आपले अमोल देह या भूमीवर धारातीर्थी ठेवले त्याबद्दल. माझ्या डोळसमोर हवालदार अमरसिंग, ग्रिनेडियर सुलतान, ग्रिनेडियर रामधारी आणि असेच जिवाला जीव येणारे पण पुन्हा कधीही न दिसणारे जवान आले.

बरोबर साडेअकरा वाजता आमच्या बोटीने भोंगा वाजवला. जवानांनी ' बोलो श्री रामचंद्रजीकी जय ' चा जयघोष केला. बोटीने रंगूनचा किनारा सोडला.

चार वर्षांपूर्वी मातृभूमीवरून मध्यपूर्वेतील आघाडीवर माझे ज्येष्ठ बंधू मेजर बाबासाहेब यांना घेऊन जाणारी एस. एस. स्ट्रॅथमोर बोटच आज मला आघाडीवरून मायदेशाकडे घेऊन जात होती.




**९ जुलै ४५**

आज सकाळी सहा वाजता आम्ही मातृभूमीच्या किनाऱ्याला वंदन करून मद्रास-वर पाऊल ठेवले.

**५ ऑगस्ट ४५**

अमेरिकेने जपानच्या हिरोशिमावर ॲटम बाँब टाकला. महायुद्धातील सर्वांत प्रचंड बातमी. दहा लाख वस्तीचं शहर सपाट झालं. पन्नास हजार माणसं दगावली. दोन लाख जखमी झाली. सारं जग हादरलं. जपान अजूनही नमत नाही.

**९ ऑगस्ट ४५**

पुन्हा ॲटम बाँब. नागासाकी बेचिराख. जपानची अजूनही शरणागती नाही.

**१८ ऑगस्ट ४५**

जपान शरण.

## स मा प्त

 पृष्ठ ११ वरून

परिस्थितीत यशवंतरावांची स्थिती अजून तशीच राहिली आहे का? परिस्थिती झपाट्याने बदलते आहे. इंदिरा गांधींच्या गतीमान राजकारणात जुनी गणिते, चालू समीकरणे सगळी बदलत आहेत. अशा गडबडीत यशवंतरावांचे महाराष्ट्रातील स्थान कायम आहे काय?

एका जनसंघ नेत्याने आपल्या भाषणात विनोद केला होता की, हिंदुस्थानात इंग्रज आले तागडी घेऊन नंतर मात्र त्यांनी आपल्या हाती दंडुका घेतला आणि शेवटी बंदूक. यशवंतरावांचे मात्र उलटे प्रकरण आहे म्हणे. ते दिल्लीला गेले बंदूक घेऊन. आता मात्र हाती आली तागडी.

पूर्वी महाराष्ट्र काँग्रेसची परिस्थिती अशी होती की, यशवंतराव म्हणतील ती पूर्व दिशा. जो उठे तो गाऱ्हाणे घेऊन यशवंतरावांकडे जाई. आज गाऱ्हाणी त्यांच्याकडे जात नाहीत. ती जातात थेट दिल्लीला इंदिराबाईंकडे. आणि दिशा? महाराष्ट्र काँग्रेसने एकमताने आणि यशवंतरावांच्या आशीर्वादाने राज्यसभेच्या रिकाम्या जागेसाठी कुंभारे यांचे नाव सुचविले जाते. आणि त्यांची दखलही न घेता दिल्लीहून ऐनवेळी श्रीमती देसाईंचे नाव सांगितले जाते व महाराष्ट्र काँग्रेसला हूं की चूं न करता हें नाव निमूटपणे स्वीकारावे लागते. हे कशाचे लक्षण आहे? वारा कोणत्या दिशेने वाहतो?

पूर्वी अशी अनेक उदाहरणे बारीकसारीक घडली असतील. पण श्री. कुंभारे यांचे उदाहरण ताजे आणि ढळढळीत आहे. वारे आणि दिशा याविषयी कुणाच्या मनात संभ्रम असतील तर या घटनेने त्यांचे डोळे उघडायला हरकत नाही.

अशा परिस्थितीत यशवंतराव कुणाला सर्टिफिकेट देतात यावर महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद टांगून राहणार नाही. फार तर दिल्लीचा कल कोणत्या बाजूने आहे एवढे मात्र कळू शकेल! तेव्हा यशवंतराव खरोखरच 'तसे' बोलले असले तर मराठवाड्याच्या लोकांनी एकदम गडबडून जाण्याचे काय कारण?

मराठवाड्याचे लोक मोर्चे बांधताहेत खरे. पण नेतृत्वाच्या बाबतीत तरी त्यांच्यात एकवाक्यता कुठे आहे? मराठवाड्याच्या पाच जिल्ह्यांपैकी एकही जिल्हा सुसंघटीतपणे श्री. शंकरराव चव्हाण यांच्या मागे नाही. शंकररावांनी शत्रू मात्र अनेक करून ठेवलेले आहेत. मराठवाडा विद्यापीठ प्रकरणी त्यांच्याच सहकाऱ्यांनी त्यांची बदनामी करण्याचा प्रयत्न केला होता. मराठवाड्यातल्या काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये थोडासा कानोसा घेतला की शंकररावांविषयी आदर आढळून येईल. पण फारसे प्रेम दिसणार नाही.

मग मराठवाड्याची मंडळी कुणासाठी मोर्चे बांधत आहेत? सध्याचे राजकारण

असे आहे की, मराठवाड्याची मागणी जरी न्याय्य असली तरी कुणाला केन्द्रीत करून ही मागणी पुढे येत आहे हे कळल्याशिवाय तिला जोर चढणार नाही. ते मात्र अद्याप स्पष्ट झाले नाही की अखेर तडजोड म्हणून शंकररावच त्यांना स्वीकारावे लागतील ?

या साऱ्या गडबडीत श्री. वसंतराव नाईक यांची भूमिका काय आहे ? वसंतराव आपणहून सत्तेच्या मागे लागणारे नव्हेत. सत्ता त्यांच्याकडे चालत आली आहे. १९७२ नंतर मुख्यमंत्रीपदावर राहण्यात इंटरेस्ट नसल्याचे खाजगी भाषणांमध्ये त्यांनी अनेकदा बोलून दाखविल्याचे वृत्त आहे. मागे त्यांची बदनामी करण्याचा जो प्रयत्न झाला त्यामुळे तर त्यांना म्हणे राजकारणाचा उबगच आला होता. तेव्हा दिल्लीची इच्छा नसल्यासही इकडे आतूर होऊन प्रयत्न करणारांपैकी ते नव्हेत. दिल्लीला हवे असल्यास ते कदाचित राजी होतीलही.

परंतु एवढे मात्र खरे की गेल्या तीन-चार वर्षात श्री. नाईक यांनी आपल्या स्वभावामुळे महाराष्ट्राच्या राजकारणावर निश्चित छाप बसविली आहे. आपली मते ते ठामपणे मांडतात. विरोधी पक्षांचे लोकही त्यांच्या स्वभावाविषयी नेहमी जिव्हाळ्याने बोलतात. एवढेच काय मराठवाड्यातही त्यांच्यावर प्रेम करणारे काँग्रेस कार्यकर्ते आहेत. त्यांच्यावर टीका कितीही झाली तरी शासनावर त्यांची पकड चांगली आहे. या दुष्काळात त्यांनी जी तडफ दाखविली त्यामुळे मराठवाड्याचे लोकही त्यांच्यावर खूष आहेत.

राज्याच्या मुख्यमंत्रीपदाच्या आखाड्यात आणखी कोणकोण पैलवान दंड ठोकून उभे आहेत याची चर्चा अनेकदा झाली आहे. वर्तकांचेही नाव मागे सांगितले होतेच, पण चर्चेमध्ये नव्याने येणारी नावे म्हणजे वन व गृहनिर्माण मंत्री श्री. नासिकराव तिरपुडे आणि सहकारमंत्री श्री. यशवंतराव मोहिते. मराठवाड्याच्या मागणीच्या गडबडीत ते मागे पडतील; पण दोघेही चांगलेच महत्त्वकांक्षी आहेत. ७२ साठी नाही तर निदान ७७ साठी तरी त्यांच्यावर नजर ठेवायला हवी. दुर्लक्षून चालणार नाही.

एवढे पुरे. खरे म्हणजे देशापुढे, राज्यापुढे, समाजापुढे एवढे भीषण प्रश्न 'आ' वासून उभे असताना पुढचे वर्षी-मुख्यमंत्री कोण होणार या वांझ, निराधार आणि केवळ तर्कयुक्त चर्चेत कुणाला रस वाटायला नको. पण इलाज नाही. कुठल्या कोरड्या विषयावर चर्चा करण्यापेक्षा, याची खोड सांग, त्याची कुचाळकी कर, तिसऱ्याला टोमणा हाण, चौथ्याचे लफडे बाहेर काढ अशा वैयक्तिक गप्पागोष्टी ऐकण्यातच मौज वाटते. मानवी स्वभाव आहे.

पण आपण मात्र आता निवडणुका हातघाईवर येईपर्यंत या विषयाच्या कुचाळकीत पडणार नाही, असा कानावर खडा ठेवतो. (अर्थात कोणत्या धावपळीत हा खडा खाली पडला तर त्यावर काय इलाज ?) ◻ ◻ ◻

# थंड हवेतील गरम चर्चा

**नरेंद्र दाभोळकर**

होणार होणार म्हणून गाजत असलेले महाराष्ट राज्य कबड्डी असोसिएशनचे पावसाळी शिबीर ११ व १२ ता. पार पडले. गरमागरम चर्चा करताना निदान ठिकाण तरी थंड हवेचे असावे या कल्पनेने बहुधा खंडाळयाची निवड केली असावी.

पावसाळी शिबिराचा हा उपक्रम चार वर्षांपूर्वी असोशिएशनने चालू केला. वर्षाभरात होणाऱ्या स्पर्धांचा कार्यक्रम जाहीर करावा . त्यातील अडचणी दूर करण्याचा प्रयत्न व्हावा ही शिबिरामागची मूळ कल्पना. हळूहळू संघटनात्मक अडचणी, सामन्यांचे विविध नियम, खेळाच्या विकासाची आगामी वर्षातील दिशा या गोष्टींचाही विचार शिबिरात होऊ लागला. शिबिरांना महत्व येऊ लागले. सुरवातीला शिबिरात थोडया व्यक्ती, संस्थाच, हजर राहात. शिबिरातील महत्वाचे निर्णय हे बहुसंख्य संस्थांच्यापर्यंत पोचले तरी त्यांबाबत त्या उदासीन राहात. किंबहुना हे नियम कधी झाले ? कुणी केले ? असेही प्रश्न बहुसंख्यांच्याकडून येऊ लागले. दुर्दैवाने महाराष्ट्र राज्य कबड्डी असोशिएशनच्या याबाबतच्या काही प्रमाणात शिथिल व सदोष अंमलबजावणीमुळे या प्रश्नातून निर्माण होणाऱ्या वादाची तीव्रता वाढू लागली. गेल्या वर्षी केलेल्या नियमातून निर्माण झालेला गोंधळ, आव्हाने प्रतिआव्हाने यामुळे महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचा रंगमच गेले तीन-चार महिने धुमसत होता. साध्या साध्या गोष्टींना भलतेच महत्व प्राप्त झाले होते. कोण कुणावर कशी कुरघोडी करणार याचे मोर्चे बांधले जात होते. खंडाळयाच्या शिबिराच्या वृत्तांताबद्दल म्हणूनच महाराष्ट्रातील कबड्डी खेळाडूंत, संघटकांत एक प्रकारचे औत्सुक्य होते.

शिबिरासाठी पाठविलेल्या परिपत्रकातील शेवटच्या पत्राने या गोंधळावर कळस चढवला. शिबिरामध्ये सामने भरविणाऱ्या संस्थापैकीं प्रत्येक संस्थेच्या एक वा अधिक प्रतिनिधींनी उपस्थित राहावे. ही आधीची सूचना. आवश्यक ते शुल्क देऊन यासाठी सामने भरविणाऱ्या महाराष्ट्रातील सर्वच संस्थानी आपापले प्रतिनिधी नोंदवले. किती झाले तरी त्यांच्याच दृष्टीने हे शिबीर सर्वांत महत्वाचे होते. शिबिरातील निर्णयावरून त्यांच्या स्पर्धांची भवितव्ये आणि स्वरूप ठरणार होते आणि ऐनवेळी महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनने शेलवॉंब टाकला. " फक्त एकच प्रतिनिधी यावा आणि त्यानेही पहिल्या दिवशी अवघ्या दोन तासाच्या चर्चेनंतर शिबीर

सोडावे." ही एकतर्फी निर्णायक सूचना अपमानस्पद होतीच आणि हेतुबद्दल संशय निर्माण करणारी होती. शिबिराला सुरवात व्हावयाची होती दुपारी दोनपासून पण सकाळपासून आलेल्या प्रतिनिधींमध्ये हाच विषय रंगत होता. आपापले व्यवसाय बाजूला ठेवून ज्यांनी दोन दिवसांची सवड काढली ते सांगलीचे खासदार अण्णासाहेब गोरखिडे, सोलापूरचे यल्लाप्पा जेनुरे, मिरजेचे वैद्य-करमरकर ही सर्व आणि इतर आठदहा संस्थांचे प्रतिनिधीही आपापल्या क्षेत्रातील कामाची माणसे होती. केवळ दोन तासांसाठी आणि केवळ सूचना देण्यासाठी इतक्या लांब रखडत येण्याचे त्यांना काही कारण नव्हते. सर्वच संस्था-प्रतिनिधिनी या बदलाबाबत राज्य असोसिएशनला धारेवर धरले. आपली न पटणारी भूमिका मांडण्याचा केविलवाणा प्रयत्न पत्रकांच्या अध्वर्यूंनी केला. अर्थातच त्यांना माघार घ्यावी लागली आणि साऱ्या संस्थांचे प्रतिनिधी दोन्हीही दिवस शिबिरात राहिले.

अधिकृतपणे प्रवेश नोंदला. गेला नाही म्हणून राणाप्रतापचे प्रतिनिधी हेमंत जोगदेव यांना बाहेर जाण्याची पाळी अगदी सुरवातीला आली. हा मुद्दा विलक्षण खडाजंगी उडविणारा ठरला. 'नियमाचे पालन करावयास हरकत नाही पण तुम्हीच पुरविलेल्या माहितीप्रमाणे नियमाचे काटेकोर पालन केले तर शिबिराला सर्वच जिल्हा आणि संस्था प्रतिनिधी बसू शकत नाहीत.' हा मुद्दा पुण्याच्या केळकरांनी मांडला. जवळ जवळ सगळयांचाच त्याला संपूर्ण पाठिंबा होता. शेवटी हेमंत जोगदेवांना परत बोलविले गेले. कबड्डीचे सगळे मंदिर हे सामने भरविणाऱ्या या संस्थांच्या पायाभूत आधारावर उभे आहे. महाराष्ट्रात एखादे वर्षी कबड्डीचे सामनेच भरले नाहीत तर असोसिएशनच्या कामाचे आणि खेळाचे काय ज्ञान राहील ? याचा विचार वरील दोन्ही प्रकार घडविण्याआधीच सूज्ञांनी करावयास हवा होता. विनाकारण कटुता वाढवून काय साधले ? शिवाय एका बाजूला नियम लक्षात न घेता त्यामागची भावना लक्षात घ्या हे सांगत असतानाच दुसऱ्या बाजूने नियमांची शिस्त पहिली अशा दोन्ही भूमिका वठवणे हास्यास्पद नाही का ? का सोईस्करपणे नियमांचे पालन आणि सोईप्रमाणे नियमामागच्या भावनेचे पालन ! पहिल्या दोन वादग्रस्त घटनांनी चर्चेला निराळेच स्वरूप आले आणि मग पुढची चर्चाही मुळी वेगच घेईना. सुमारे साडेतीन चार तासांच्या चर्चेनंतर मग खुल्या चर्चेचे स्वरुप बदलून गटवार चर्चा करण्याचे निर्णय घेण्यात आले.

गटवार चर्चा ही कल्पना रामबाण ठरली. संबंधित हितसंबंधी एकत्रित आल्याने सामने भरविणाऱ्या संस्थेच्या प्रतिनिधींना मनमोकळेपणे चर्चा करून निष्कर्षाला येणे सोपे झाले. दुसऱ्या गटाने पंच, निरीक्षक, पंचमंडळ वगैरे गोष्टींबाबतची चर्चा केली.

दोन गटांनी एकमुखाने संमत केलेले हे निष्कर्ष सकाळी खुल्या चर्चेसाठी सर्वांच्या पुढे आले. वातावरण खूपच निवळले होते. चर्चा आटोपशीर आणि नेमकी

झाली. अखिल भारतीय पातळीवरचे सामने हा थट्टेचा विषय काही ठिकाणी होतो. तेव्हा महाराष्ट्राबाहेरील किमान तीन प्रांतातले संघ सामन्यात भाग घेण्यास आणलेच पाहिजेत हा दंडक स्वत: संस्थाचालकांनीच घालून घेतला. तीन वर्षांपर्यंत प्रयत्न करूनही ही गोष्ट साध्य न झाल्यास पुढे तीन वर्षे त्यांना फक्त महाराष्ट्र राज्य पातळीवरचेच सामने भरविण्यास मान्यता द्यावी हेही मान्य झाले. खाजगी संघाची होणारी कुचंबणा थांबविण्यासाठी फक्त व्यावसायिक अगर फक्त खाजगी संघाचेच सामने भरवावेत आणि दोन वर्षांतून किमान एकदा खाजगी संघाचे सामने भरवावेतच हाही नियम, मागच्यावर्षीचाच – पण पक्का केला. विभागातून एकाच्या ऐवजी दोन संघच वर घेतले जावेत हा मागच्या वर्षी वादाला कारणीभूत ठरलेला विषय दोन या आकड्यावर शिक्कामोर्तब करून अधिकृतपणे संपविण्यात आला.

पंच, निरीक्षकाचे अधिकार हा आणखी एक वादग्रस्त मुद्दा. पंच ठरविणे अथवा वैयक्तिक बक्षीस कोणाला द्यावयाचे याला त्याची अनुमति घेणे हे त्याचे अधिकारक्षेत्र नाही ही गोष्ट पक्की केली गेली. त्याच्या मर्यादा नेमक्या आखून दिल्या गेल्या. पंच आणि निरीक्षक हे शक्यतो सामने भरविणाऱ्या संस्थेच्या जिल्ह्यातलेच नसावेत. असा संकेत ठरला. कुठल्याही प्रकारच्या रोख बक्षिसांना बंदी घालण्यात आली. इतर स्वरुपातील बक्षिसे देतानाही ती सामना समितीच्या निवडमंडळामार्फतच द्यावयास हवीत. आपल्या आवडत्या खेळाडूला खेळ झाला नसतानाही त्याला हेतु:पुर:सर उचलून धरण्याचा प्रयत्न यामुळे थांबविला जाईल.

सांगली प्रकरणाचे पडसाद या शिबिरात उमटावेत ही स्वाभाविक अपेक्षा. खासदार अण्णासाहेब गोटखिंडे यांनी हा प्रश्न उपस्थित करूनही तो चर्चेला येऊ शकला नाही. या विषयावर एक समिती नेमली आहे. ती गव्हर्निंग कौन्सिलला आपला अहवाल सादर करील आणि मग त्यावर निर्णय घेतला जाईल, असे उत्तर खासदारसाहेबांना मिळाले. सांगली प्रकरणाच्या संदर्भात इतर अनेक प्रश्न उपस्थित होणार होते, त्याची परस्परच वासलात लागली. आमच्या अंगात ताकद असेल तर– आणि ती आहे, सांगलीकर–सोलापूरकरांना पुढील वर्षी अ. भा. स्पर्धेसाठी परवानगी कशी मिळते पाहू हा म. रा. क. अ. च्या एका जबाबदार कार्यकर्त्यांचा पवित्रा आणि सांगलीकरांचे तसेच काही अनुत्तरीत करणारे प्रश्न याची जुगलबंदी पाहाण्याचा योग यामुळे हुकला. कबड्डीच्या भल्यासाठी अर्थातच हा योग कधीच आला नाही तरच बरे वाटेल. ज्या तथाकथित अखिल भारतीय कबड्डीचा व्याप महाराष्ट्रातल्या काही जिल्ह्यापुरताच मर्यादित आहे. त्याला आता कुठे बाळसे येत असताना हा वाद न निघणेच श्रेयस्कर.

साताऱ्करांनी एक चांगली सूचना शेवटी केली. कबड्डीमध्ये त्या गोष्टीची नितांत आवश्यकता त्या बदलत्या स्वरूपाबद्दल हा प्रश्न होता. कबड्डी क्रीडा रसिकांच्या जिव्हाळ्याच्या या प्रश्नाबद्दल आतापर्यंतच्या कोणत्याच शिबिरात चर्चा होऊ नये

वा बैठकीसाठी पाठविलेल्या मुद्द्यांमध्येही त्याचा उल्लेख असू नये हे दुर्दैवच. या प्रश्नावरची निकड सर्वांनाच मान्य झाली. कमी जागेत, ठराविक वेळेत, एका दमात शारीरिक संघर्ष आणि कौशल्य याचा मिलाफ घडविणारा खेळ म्हणजे कबड्डी. कबड्डीच्या ह्या स्वरूपाला जास्तीत जास्त उठाव देण्यासाठी या मूलभूत गोष्टी कायम ठेवून कबड्डीत काही बदल घडविणे अत्यावश्यक आहे. कबड्डीचा सध्याचा कंटाळवाणेपणा वाढत चालला तर कबड्डीकडे क्रीडारसिक लवकरच पाठ फिरवतील. कबड्डीला गतिमानता येईल हे बघणे अतिशय आवश्यक आहे. पुण्याच्या सन्मित्र संघाचा प्रयत्न सोडला तर याबाबत प्रयत्न कुणी केलेच नाहीत. महाराष्ट्रातील कबड्डी क्षेत्रातील सर्व संस्था व व्यक्तींकडून या संदर्भात सूचना मागवाव्यात. एका समितीने त्यातील तीन सर्वोत्तम सूचना निवडाव्यात आणि प्रायोगिक चाचणीवर मग या स्वरूपाचे सामने भरवूनही बघावेत असा आराखडा केला गेला. सातारच्या श्री. शिवाजी उदय मंडळाने, सांगलीच्या तरुण भारतने आणि सोलापूरच्या जय भवानीने तर ही प्रायोगिक चाचण्यांची जबाबदारी घेण्याचे मान्यही केले. शिबिराचे उद्‌घाटन क्रीडा अनुदान मंडळाचे प्रमुख वाखारकर यांच्या हस्ते झाले. त्यांचे भाषण अतिशय तळमळीचे आणि उद्‌बोधक झाले. कबड्डी असोसिएशनच्या कामाचा त्यांनी मनमोकळा गौरव केला. सरकारच्या मर्यादा स्पष्ट केल्या आणि त्याबरोबरच कबड्डीमध्ये प्रायोगिक स्वरूपाच्या नवीन विचारांची आवश्यकताही हिरिरीने पुढे मांडली. बेसबॉलसारखा खेळ अजूनही बदलतो आहे तर कबड्डीला बदलत राहाण्यासाठी काय हरकत आहे, असा प्रश्न त्यांनी विचारला. शिबिराच्या शेवटची दहा मिनिटे वगळता याबाबत विचारच झाला नाही हे फारसे भूषणावह नाही. वेळेच्या आधीच शिबिराचे सूप वाजविले जात असताना कबड्डीचे बदलते स्वरूप कसे असावे यासाठी थोडा अधिक वेळ सर्वांनी काढला असता तर बरे झाले असते. समारोपाचे भाषण भारतीय क्रीडा संघटक आणि कबड्डीचे अध्वर्यू शंकरराव साळवी यांनी केले. कबड्डीसाठी तळमळीने काम करणारा, फटकळपणे बोलणारा आणि भव्य दिव्य घडविण्यासाठी धडपडणारा असा हा माणूस. त्याचे हे सारे गुण त्यांच्या समारोपाच्या भाषणात व्यक्त झाले. पण का कोण जाणे, प्रतिनिधींच्या हृदयाला ते तेवढे भिडलेले दिसले नाही. विचारांची एकवाक्यता आणि भावनेची विभिन्नता असा प्रकार याबाबत होतो का- खरे तर होतोच. याची प्रामाणिक चौकशी प्रत्येकाने स्वतःच्या मनाशी केली पाहिजे आणि वैयक्तिक भावनांचा हा कारणापरत्वे आलेला दुरावा बाजूला करून संघटनेला केवळ नियमाने नव्हे मनानेही एकसंधपणे उभे केले तर—कबड्डीमध्ये खऱ्या अर्थाने क्रांती घडू शकेल.

□ □ □

अधिक दिव्य होते. बापूजींची अहिंसा, आत्मत्याग व निर्भयपणा याचे सर्वोत्कृष्ट दर्शन त्यांच्या हौतात्म्यांत होते. मृत्यूला स्वतःहोऊन सामोरे जाणाऱ्याचे धैर्य केवढे असेल, हा आत्मत्याग करताना कोणत्या विचारांनी त्याला झपाटले असेल! खरोखर कै. पानसरे यांना उपमा देण्यासाठी दधिचि ऋषीखेरीज दुसरी उपमा सुचत नाही.

श्री. गोविंदराव पानसरे यांचे वडील पुण्याचे. परंतु व्यवसायानिमित्त हैद्राबादला स्थायिक झाले होते. गोविंदरावांचा जन्म झाला तेव्हा त्यांचे वडील श्री. विनायकराव हे दम्याच्या विकाराने झपाटलेले होते. त्यांचे दुखणे बळावले. आपला पती यातून वाचत नाही हे लक्षात येताच गोविंदरावांच्या मातेने सौभाग्य लेणे ल्यायलेल्या स्थितीत मरण्याच्या इच्छेने विषप्राषन केले आणि पतीनिधनाच्या केवळ दीड तास आधी प्राणत्याग केला. यानंतर लहानग्या गोविंदाचे पालनपोषण त्याचे मामा शंकरराव यांनी केले. ते रेल्वेत नोकरीला होते व सेवानिवृत्तीनंतर नांदेड जिल्ह्यातील धर्माबाद येथे राहू लागले. यामुळे धर्माबाद हीच श्री. पानसरे यांची कर्मभूमी झाली.

श्री. गोविंदराव यांचे इंटरपर्यंतचे शिक्षण हैद्राबादला झाले. यानंतर इंजिनिअरिंगच्या शिक्षणासाठी ते मुंबईला गेले. श्री. गोविंदराव यांचा स्वभाव जन्मजातच सात्विक होता. त्यामुळे गांधीवादाचे त्यांना साहाजिकच आकर्षण वाटले. हरीपुरा कॉंग्रेस अधिवेशनात त्यांनी स्वयंसेवक म्हणून काम केले व यापुढे शिक्षणाऐवजी राजकारण हेच कार्य त्यांनी अंगिकारले.

श्री. पानसरे यांनी राजकारण अंगिकारले असे वर लिहिले, पण त्यात थोडा फरक केला पाहिजे. स्वभावगुणांनुसार त्यांना विधायक कार्याची व व्रतस्थ जीवनाची आवड होती. या काळात पानसरे संपूर्ण बदलून गेले. पोषाखात साधेपणा आला. आवश्यक तेवढाच पोषाख या ब्रीदाला अनुसरून धोतर, उपरणे व घोंगडी एवढीच जंगम मालमत्ता त्यांनी बाळगली. श्री. पानसरे यांचे व्यक्तिमत्व आकर्षक नव्हते. त्यामुळे पहिल्याप्रथम त्यांच्याबद्दल अनुकूल मत होत नसे पण एकदा जो त्यांच्या संपर्कात आला तो कायमचा त्यांचा होई. त्यांच्या वाक्यावाक्यातून त्यांची तळमळ व सचोटी याचे दर्शन होत असे. कै. पानसरे म्हणजे व्रतस्थ जीवनाची मर्यादा होती. अपरिग्रह तर त्यांनी अनुसरला होताच पण बंगालच्या दुष्काळामुळे त्यांनी तांदूळ सोडला. स्टेट कॉंग्रेसवरील बंदी उठावी म्हणून त्यांनी मीठ सोडले, तर पुढाऱ्यांच्या अटकेच्या दुःखापायी गोड-धोड सोडले. एका नोकरावर चुकून चप्पल उगारली त्याचे प्रायश्चित म्हणून चपलांचा कायमचा त्याग केला. आजच्या तरुण पिढीला हे वर्तन हास्यास्पद वाटण्याजोगे आहे पण तो काळ बापूजींच्या प्रभावाचा

काळ होता. त्यांच्या प्रभावाने अशा हजारो आत्मत्यागी कार्यकर्त्यांची प्रभावळ निर्माण झाली होती व मराठवाड्यापुरते पानसरे त्यातील मानकरी होते.

गोविंदराव पानसरे हे राजकारणात पक्केच होते असे म्हटले पाहिजे. कारण त्यांनी पाहाता पाहाता मुधोळ तालुक्यात स्टेट कॉंग्रेसच्या किसान संघटना काढून नावारूपाला आणल्या. केवळ धर्माबादच्या परिसरात त्यांनी कॉंग्रेसचे ६ हजार सदस्य व खादीधाऱ्यांचे ३०० जणांचे दल उभे केले. पानसरे हे केवळ अनुयायी-कार्यकर्ते नव्हते तर त्यांच्या स्वयंप्रज्ञ विचारसरणीचे वरचेवर दर्शन होई. पक्ष-सदस्यांपुढे नियमित कार्यक्रम ठेवला नाहीतर कार्यकर्त्यांत अनादर व अनास्था वाढत जाते, परिणामी ऐन चळवळीच्या वेळी जनतेच्या शक्तीचे यथायोग्य आकलन करणे कठीण जाते असे त्यांनी लिहून ठेवले आहे. त्रिमंत्रीसमिती भारतात आली तेव्हा संस्थानी प्रजेच्या जबाबदार राज्यपद्धतीच्या मागणीचा प्रश्न त्यांच्यापुढे मांडावयास हवा होता. त्या योगें संस्थानी प्रजेच्या आकांक्षांचा प्रश्न जगाच्या वेशीवर मांडला गेला असता असे त्यांनी वरिष्ठ नेत्यांना पत्र लिहून कळविले होते.

निजामांच्या मुख्यमंत्र्यांना लिहिलेल्या एका पत्रात त्यांनी मुख्यप्रधानांच्या कर्तव्यच्युत वर्तनाबद्दल त्यांच्यावर ठपका ठेवला होता. शेतकऱ्यांना सरकार जीवनोपयोगी वस्तू देऊ शकत नसेल तर सर्वांना जेलमध्ये पाठवावे; तेथे तरी त्यांना आवश्यक अन्न मिळेल असे त्यांनी सुचविले होते.

या काळात निजामी अधिकाऱ्यांचा जुलूम चालूच होता. लोकशाहीची परंपराच नसलेल्या राजवटीत किमान माणुसकीची अपेक्षा करणेच चूक होते. त्यातच राजकीय तेढ वाढली होती. निजामी सत्ता म्हणजे सर्वशक्तिमान परमेश्वराने मुसलमानांना दिलेली जहागिरी असे मानणाऱ्यांनी त्या सत्तेच्या संरक्षणासाठी इतिहादुल मुसलिमिन संघटना उभारली होती. या संस्थेची स्वयंसेवक पथके (रझाकार) जागोजाग आकार घेत होती. परंतु इतिहादुल मुसलिमिन संघटकांची राजकीय झेप अगदीच कोती होती. हिंदूंच्या सोडाच पण मुसलमानांच्याही राजकीय आकांक्षांचा त्यांनी काही विचार केलेला नव्हता. निश्चित राजकीय दृष्टिकोना-अभावी ही संघटना केवळ गुंडपुंडांची संघटना बनली. निर्जीव व निःशस्त्र हिंदूंवर अत्याचार करणे हेच संघटनेचे उद्दिष्ट बनले. या काळात शासन यंत्रणा व रझाकार यांच्यात पूर्णपणे मनोमीलन झाले होते. त्यामुळे अत्याचारांना ऊत आला होता. चिडलेली व जागृत झालेली जनताही आता त्यांना रोखठोक उत्तरे देऊ लागली. बंदुकीला बंदूक भिडू लागली. अहिंसावादी पानसऱ्यांना हा प्रकार पसंत नसे पण त्यांनी आपल्या लोकांचा तेजोभंग करण्याचा कधीच प्रयत्न केला नाही. अहिंसक आत्मसमर्पण भेकड हिंसेवर मात करू शकते हे उदाहरणाने लोकांना पटवून देणे आवश्यक होते. त्याप्रमाणे वेळ आलीच.

त्यावेळी सरकारी अधिकाऱ्यांचा सर्वत्र जुलूम चाललाच होता. त्याला चिडून

माळकौठ्याच्या ग्रामीणांनी नांदेडच्या तहसीलदाराचा खून केला. सारी सत्ता हादरली. दमनचक्र सुरू झाले. पोलीस व रझाकारांनी माळकौठ्याला वेढा घातला. मारझोड झाली. गावातील तरणीबांड पोरे व कार्यकर्ते यांना पकडून त्यांच्या विरुद्ध खुनाच्या अभियोगाचा खटला उभा राहिला. श्री. पानसरे या प्रकाराने अवाक् झाले. रात्रभर त्यांना झोप आली नाही. आपले कर्तव्य काय ? आपण लोकांच्या हिंसामय कृतीचा निषेध करावा काय ? जे झाले ते योग्य की अयोग्य ? रात्रभर त्यांच्या डोक्यात काहूर उठले. शेवटी त्यांनी निश्चय केला. सरकारला त्यांनी एक पत्र लिहिले. आपण स्वतः अहिंसावादी असलो तरी केवळ तेवढ्यावरून माळकौठा येथील प्रजेने केलेल्या कृत्याचा निषेध करू शकत नाहीत. प्राप्त परिस्थितीत त्यांना त्याशिवाय दुसरा मार्गच नव्हता अशी आपली मनोधारणा आहे. दुसऱ्या अर्थाने आपण त्यांच्या ऊद्दिष्टांशी मनानेतरी सहमत असल्याने आपणही त्यांच्याप्रमाणेच मानसिक गुन्हा केलेला आहे म्हणून शासनाने आपल्यालाही अहिंसक गुन्हेगार समजून आरोपी ठरवावे व इतरांप्रमाणे फाशीची शिक्षा सुनवावी अशी त्यांनी मागणी केली. सारे संस्थान त्यांच्या निवेदनाने हादरले. एका सरकारी अधिकाऱ्याच्या खुनाचे जाहीर समर्थन करण्याचा व त्याच्या परिणामांची अपेक्षा करण्याचा तो प्रकारच अदभूत होता. सरकारने पानसऱ्यांच्याविरुद्ध त्यावेळी कांही कृती केली नाही पण त्यांच्या निवेदनाने साऱ्या लोकांचे लक्ष माळकोठ्याच्या गुन्हेगारांकडे वेधले गेले. त्याचबरोबर सरकारचा रोषही पानसऱ्यांनी स्वतःवर ओढवून घेतला. आणि त्यांना एके दिवशी राजद्रोहाच्या आरोपावरून अटक केली व बिलोली कोर्टांपुढे उभे केले.

राजद्रोहाचा आरोप ! साधासुधा नव्हे. तरीही पानसरे अविचल होते. आपल्याला सरकारने लोकमान्य टिळक, म. गांधी यांच्या पातळीवर नेऊन बसविले म्हणून ते हंसत होते. आरोप भयंकर असल्याने त्यांची जामिनावर सुटका करण्यास कोर्टाने दोनतीन वेळा नकार दिला. शेवटी वकिलांच्या खटपटीला यश आले व अखेर पानसरे यांची जामीनावर मुक्तता झाली. सायंकाळ झाली होती. पानसऱ्यांनी वेळ न घालवता आपल्या कर्मभूमीस म्हणजे धर्माबादला प्रस्थान ठेवले. बिलोली गोदावरीच्या दक्षिण तीरावर तर धर्माबाद उत्तर तीरावर. जवळजवळ हांकेच्या अंतरावर, परंतु पानसरे तेथे पोचू शकले नाहीत. नियतीने हौतात्म्यासाठी गोदाकाठची जागा राखून ठेवलेली होती.

बिलोलीला त्या दिवशी रझाकारांची प्रचंड रॅली भरली होती. नेत्यांची अत्यंत प्रक्षोभक भाषणे झाली होती. बिलोली भाग पानसऱ्यांच्या प्रभावक्षेत्राखाली असल्याने त्यांच्याविरुद्ध काहूर उठविले गेले. परमेश्वराच्या आशीर्वाद असलेल्या सल्तनतीला पानसरे खतरा पैदा करीत आहेत अशी चिथावणी देण्यात आली. सभेचे वातावरण तापले. अल्ला हो अकबर, दीन दीनचे नारे उठले असतानाही सल्तनत

पाचंदाबाद, पानसरे मुर्दाबादचा घोष झाला आणि हा घोष खरा करण्यासाठी काही रझाकार त्यांच्यामागे धावले.

श्री. पानसरे यावेळी बैलगाडीतून आपल्या सहकाऱ्यांबरोबर धर्माबादकडे निघाले होतें. पुढे कोणती चळवळ करावयाची यावर विचारविनिमय होत होता. गाडी अजीफरपर्यंत आली तोंच रझाकार दौडत आले. उन्मत्त बेहोश रझाकारांनी पाहाता पाहाता गाडीला गराडा घातला. पुन्हा अल्ला हो ... चा नारा बुलंद झाला.

'इसमे पानसरे कौन है ?' विचारणा झाली.

हा प्रसंग पाहून काही कार्यकर्ते गर्भगळित झाले. त्यांनी गाडीतून उडी टाकून सूंबाल्या केला. पळणारी व्यक्ती पानसरे असू शकत नाही याची खात्री असल्याने रझाकारांनी त्या पळपुट्यांना अटकाव केला नाही.

प्रत्यक्ष मरण समोर दिसताना कसे वागावे ? पुंडलिक पाटील व गोविंदराव पानसऱ्यांसारखे !

पुंडलिक पाटील हुंगरगेकर हा तरूण पानसऱ्यांचा एकनिष्ठ अनुयायी होता. पानसऱ्यांच्या जीवावर बेतले आहे हे त्याने ताडले. धैर्याने तो पुढे झाला व म्हणाला,

'मैं हूं'

रझाकारांच्या तलवारी उंचावल्या. मावळत्या सूर्याच्या प्रकाशात क्षीणपणे चमकल्या व पुंडलिकरावांच्या अंगावर पडल्या. पानसऱ्यांना भरपूर अवधी मिळाला होता. इतर सहकाऱ्यांप्रमाणे ते पळून जाऊ शकले असते. पण मृत्युला सामोरे जाणाऱ्यांची जातच वेगळी असते. परमेश्वराने त्यांच्या घडणीसाठी वेगळेच रसायन निर्मिलेले असतें. तें शांतपणे पण कठोर शब्दात म्हणाले.

'अरे त्याला का मारता ? मैं हूं पानसरे, मुझे पहेचानो, मारना है तो मुझे मारो !' त्यांनी रझाकाराच्या नेत्यापुढे मान वाकविली.

नेत्याने दारूने धुंद झालेले डोळे नीट उघडले. 'अरे सच, यही पानसरे है।

आणि मग सपासप तलवारी पडल्या. धड आणि मुंडके अलग झाले. पानसरे यांना हौतात्म्य प्राप्त झाले.

दिवाळीच्या २-४ दिवस आधी २१ ऑक्टोबर १९४६ रोजो अजीपूर जवळ ही घटना घडली !

पानसऱ्यांच्या वधाची बातमी सर्वत्र वाऱ्यासारखी पसरली. त्यांच्या प्रेतयात्रेच्या वेळी अलोट गर्दी होईल हे जाणून सरकारने पोलिसांकरवी त्यांचे प्रेत बेवारशासारखे गुपचुप जाळून टाकले. हुतात्मा भगतसिंग यांच्या प्रेताची ज्या प्रकारे विल्हेवाट लावली तोच मान पानसऱ्यांना मिळाला. जुलमी शासनाला जिवंत क्रांतिकारकापेक्षाही हुतात्म्यांचे अधिक भय वाटते. आणि ते खरेही ठरले. पानसऱ्यांच्या वधाने सारी संस्थानी प्रजा खवळून उठली. जागोजाग उठाव झाले. उमरी बँक

प्रकरणही त्यातलेच. लूट यशस्वी झाल्यावर जयजयकार झाला तो हुतात्मा पानसऱ्यांचा. पानसऱ्यांच्या हौतात्म्यानंतर असंतोषाच्या ज्या ज्वाला उठल्या त्यातच निजामशाही जळून खाक झाली. म्हणून २१ ऑक्टोबरचा हुतात्मादिन हा हैद्राबाद मुक्ती संग्रामातील महत्वाचा टप्पा ठरतो. शेवटी प्रजेची मुक्तता झाली आणि दक्षिण गंगा गोदावरीच्या काठी घोटाळणारा पानसऱ्यांचा आत्मा समाधानाने आकाशगंगेत विलीन झाला !

जनतेची स्मरणशक्ती फार तोकडी असते. त्यामुळे त्यागी वीरांचें स्मरण सतत राहाण्यासाठी त्यांची स्मारके बांधावी लागतात. दुर्दैवाने हुतात्मा पानसरे यांची शासनाला किंवा कुणाला फारशी आठवण नाही. कै. पानसरे यांचे सहकारी श्री. विठ्ठलराव रत्नाळीकर यांनी लिहिलेले छोटेखानी चरित्रच त्यांच्या जीवनाची माहिती देणारे साहित्य उपलब्ध आहे. धर्माबाद ही त्यांची कर्मभूमी. तेथील कार्यकर्त्यांनी हु. पानसरे यांच्या नावाने हायस्कूल चालविले आहे. अर्जापूर येथील पानसऱ्यांची समाधी कालपरवापर्यंत उपेक्षित होती. परंतु बिलोलीचे आमदार जयराम अंबेकर यांच्या प्रेरणेने अर्जापूरला सीमेंट पाइपची सहकारी फॅक्टरी उभी राहिली. या फॅक्टरीच्या आवारात समाधी आली असून ती आता चांगली बांधून काढली आहे. नांदेडला पीपल्स कॉलेजच्या वाचनालयाला त्यांचे नाव दिले आहे. विद्यमान लेखक नांदेड नगरपालिकेचा सदस्य असून त्याने पीपल्स कॉलेजकडे जाणाऱ्या रस्त्याला ' हुतात्मा पानसरे मार्ग ' नाव द्यावे असा ठराव आणला होता पण सत्तारूढ पक्षाने तो डावलला. मराठवाड्यांतील या आद्य हुतात्म्याचे साधे स्मरणही आज कोणाला होत नाही. कालाय तस्मै नमः

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS ( Weekly ) | 50 Paise | Regd. No. M-H 649

घरात पुन्हा पाळणा हलण्यापूर्वी

# विचार करा

प्रथम पहिल्या मुलीची
सर्व तरतूद
नीट करायला
नको का?



[illegible] दूध, सकस अन्न, कपडे, खेळणी पुस्तके व इतर अनेक लहानसान गोष्टी या सर्वांची निश्चित [illegible] [illegible]साठी करणारच. आणि हे सर्व सोपे नसले तरी कसेही करून तुम्ही ते पुरवाल. पण इतक्यावरच [illegible] [illegible]ची जबाबदारी वाढवी म्हणजे ! अशी वेळ येऊ न देणे हेच योग्य नाही काय !

[illegible] लक्षावधि जोडपी हेच करीत आहेत. ती परिस्थिति अनुकूल होईपर्यंत दुसरे मूल होणे पुढे ढकलतात. [illegible] [illegible] तुम्हालाहि हे सहज करता येईल. निरोध हे जगातील फार लोकप्रिय असे, पुरुषांनी वापरायचे [illegible] [illegible] साधन आहे. लक्षात ठेवा पाळणा लांबविण्याचा सर्वात सोपा व बिनधोक मार्ग [illegible] [illegible] [illegible] [illegible] रीत्या अनुसरलेला आहे. मग तुम्हीहि निरोध का नाही वापरीत !

[illegible] मिळते. [illegible] 15 पैशांला 3 (सरकारी मदतीने).




लांबविण्यास पाळणा, उपाय साधा. सोपा [illegible]

## निरोध ▼

लक्षावधींच्या पसंतीचे साधे. बिनधोक संतति-प्रतिबंधक!

[illegible], [illegible], [illegible], [illegible] [illegible] [illegible] [illegible] सहज [illegible]

[illegible] 71/[illegible]